नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १४६ * * नागपूर * मंगळवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## ४८ लाखासह १ कोटीची ब्राऊन शुगर जप्त

■ **वृत्तसंस्था, इंदूर, दि. २५ :**
इंदूरच्या द्वारकापुरी भागात गुन्हे शाखेने एका हिस्ट्रीशीटर महिलेला अटक केली. तिच्या झोपडीतून ५१६ ग्रॅम ब्राऊन शुगर (सुमारे १ कोटी रुपये किमतीची) आणि ४८ लाख ५० हजार रोख रक्कम जप्त करण्यात आली.

छाप्यादरम्यान, घरात ठेवलेल्या लोखंडी पेट्यांमध्ये ५००, २०० आणि १०० रुपयांच्या नोटांचे बंडल सापडले, जे कपड्यांमध्ये लपवले होते. पोलिस रात्री उशिरापर्यंत नोटा मोजत राहिले. नोटा मोजण्यासाठी पोलिसांना मशीन बोलावावी लागली. ही रक्कम ४८ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. हे पैसे बेकायदेशीर ड्रग्ज व्यापारातून कमावल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. कारवाईदरम्यान, महिलेच्या कुटुंबाची पोलिसांशीही झटापट झाली.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# आपली शहरे, हरे हरे...

आपल्या भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात सुजलेली आहे. आता आपण चीनलाही मागे टाकलेले आहे म्हणजे चीन पेक्षा कमी भूभाग असलेल्या भारताची लोकसंख्या चीन पेक्षा जास्त आहे. विशेष म्हणजे अमेरिकेची गोष्ट तर सोडाच कारण अमेरिकेची जमीन भारतापेक्षा अडीच पट जास्त आहे आणि भारताची लोकसंख्या अमेरिकेच्या पाचपट जास्त आहे. महात्मा गांधी यांच्या काळात भारत हा सहा लक्ष खेड्यांचा देश होता आता अनेक खेड्यांच्या रूपाचे परावर्तन शहरांमध्ये झालेले आहे खेड्यातील चांगली अर्थव्यवस्था असलेले किंवा जास्त हुशार असलेले अनेक तरुण एक तर स्वतः एकटे नाहीतर कुटुंबासह या शहरीकरणात सामील झालेले आहेत. भारतातील लोकसंख्या ४०% शहरी झालेली आहे, महाराष्ट्राचे प्रमाण तर याहूनही जास्त असेल. मुंबईच्या आसपासची सर्व खेडी दोन-तीन जिल्ह्यांमधील दहा ते बारा महापालिकांनी अक्षरशः गिळंकृत केलेली आहेत. एकेकाळी शहरातील उत्पन्नापेक्षा खेड्यातील उत्पन्न जास्त होते आता उत्पन्नाच्या बाबतीत शहरांचा वाटा ७० टक्के पर्यंत गेलेला आहे म्हणजेच ४०% शहरी लोकांचे उत्पन्न ६०% ग्रामीण भागातील उत्पन्नापेक्षा दुपटीने जास्त आहे. एकूणच आपल्या विकासाची गंगा शहरात वाढत चाललेली आहे. पण... हा पणच अत्यंत महत्त्वाचा आहे. शहरे जसजशी वाढली तसतसे शहरीकरण अनियोजित झाले त्यात फक्त मुंबई आणि पुण्याचे उदाहरण घ्या. १९६५ पर्यंत मुंबईचा मुंबईमधील सडका दररोज पाण्याने धुतल्या जात होत्या. आता या दोन शहरांचा बकालपणा कितीतरी प्रचंड प्रमाणात वाढलेला दिसतो अशीच परिस्थिती जर इतरही लहान मोठ्या शहरांची आहे. शहरातील नागरिकांना पायाभूत सुविधाही अत्यंत दर्जाहीन दिल्या जात आहेत असे खेदाने म्हणावेसे वाटते, वाहतुकीचे म्हणाल तर तिथेही बारा वाजलेले आहेत. वाहनतुंबी (मुंबईच्या भाषेत ट्रॅफिक जॅम) इतकी वाढलेली आहे की शहरातून गाडी चालवणे दूर्धर झालेले आहे. जुनाट गाड्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. त्यासोबतच आज-काल बऱ्याच शहरांमध्ये आपले घर वातानुकूलित करण्याचा एक प्रयोग सुरू असतो त्यामुळे किती किती कार्बन आपण उत्सर्जित करतोय याचा कोणी विचार करत नाही. तो कार्बन बाहेरच्या लोकांसाठी तापमान वाढवतो या प्रदूषणा बाबत सरकार कधी बोलणार आहे का? त्यातच अति पावसामुळे शहरांमध्ये नियोजन व्यवस्था पूर्णपणे ढासळते गल्लोगल्ली घाणींचे डोंगर तयार होताना दिसतात. उन्हाळ्यात तर उष्णतेची परमावधी होते, त्याला वातानुकूलित घरे कारणीभूत आहे असे आम्ही वर म्हटलेलेच आहे. आपण जगातील सर्वाधिक जनसंख्या असलेला सर्वाधिक समस्याग्रस्त देश आहोत, हे आपले सरकार मानायलाच तयार नाही. आपल्या देशातील वाढते शहरीकरण नियोजित नसल्यामुळे या शहरांमध्ये जो कर्णकर्कश आवाज हॉर्न मधून येतो आणि भर रस्त्यात जोरात वाजणा?या डीजे आणि बँड मुळे आवाजांचे प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. शहरातील झोपडपट्ट्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत प्रत्येक शहरात बेकायदेशीर बांधकामे आहेतच. जगातील सर्वात प्रदूषण युक्त शहरांमध्ये भारताचा क्रमांक पहिला आहे. रस्ते बनवणारे अनेक ठेकेदार तीस ते चाळीस टक्के खर्चामध्ये रस्ते बनवतात बाकीच्या रकमेचे म्हणजेच त्या निधीचे काय होते हे आम्हाला अजिबात ठाऊक नाही. आपल्या देशात आणि राज्यात शहरी विकास मंत्रालय आहे आपल्या मायबाप सरकारने २०१४ साली १०० शहरांना स्मार्ट बनवण्याचा संकल्प केला होता म्हणजे स्मार्ट सिटी बनवण्याचा संकल्प केला होता. त्यापैकी अवघे इंदूर सारखे एखादे शहर सोडले तर जिकडे तिकडे बोंबाबोंबच आहे. आपल्या देशाच्या शहरी विकासासाठी आवश्यक तेवढे धन सध्या आपल्याकडे उपलब्ध नाही. आता कर्ज काढण्याचीही परमावधी झालेली आहे. याचाच अर्थ शहरांचा वाली कोणीच नाही. त्यामुळेच आपली शहरे म्हणजे, हरे हरे हरे... हे खरे असले तरी आपण आशावादी राहू या.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## तुम्हाला पुन्हा पुन्हा वचन देतो की...

# तुमचे हित सर्वोपरी!

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २५ :**
माझ्या देशातील सर्व लघू उद्योजक, शेतकरी किंवा पशुपालकांसाठी, मी तुम्हाला पुन्हा पुन्हा वचन देतो की, मोदींसाठी तुमचे हित सर्वोपरि आहे, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अहमदाबादमध्ये शेतकरी व पशुपालकांच्या मनात विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला.



ट्रम्प यांच्या टॅरिफचा उल्लेख न करता ते म्हणाले, माझे सरकार कधीही लघू उद्योजक, शेतकरी आणि पशुपालकांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. कितीही दबाव आला तरी आम्ही सहन करण्याची आमची ताकद वाढवत राहू. भाषणात त्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि काँग्रेसचा उल्लेख केला. ते म्हणाले, जगाने पाहिले आहे की आम्ही पहलगामचा बदला कसा घेतला. २२ मिनिटांत सर्व काही साफ झाले.

गुजरात ही दोन मोहनांची भूमी आहे, सुदर्शनधारी आणि चरखाधारी. सुदर्शनधारी यांनी भारताला सैन्याच्या शौर्य आणि इच्छाशक्तीचे प्रतीक बनवले. चरखाधारी यांनी भारताला स्वावलंबी बनवले आहे.

पंतप्रधान दोन दिवसीय गुजरात दौऱ्यावर आहेत. ते संध्याकाळी ५ वाजता अहमदाबादला पोहोचले आणि नरोडा ते निकोल असा सुमारे ३ किमीचा रोड शो केला. त्यांनी हात दाखवत लोकांचे स्वागत केले. यादरम्यान, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राज्यपाल देवव्रत आचार्य यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. त्यांनी ५४७७ कोटी रुपयांच्या विकासकामांचा श्री गणेशा केला. साबरमती ते काटोसन रोड ट्रेन आणि कारने भरलेल्या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला.

## .. तर सरकार उलथवून टाकू

मनोज जरांगेंचा इशारा ■ बुधवारी सकाळी मुंबईला निघणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २७ तारखेला सकाळी १० वा. मुंबईच्या दिशेने कूच करण्याची घोषणा केली आहे. मराठा आंदोलक आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवारी सकाळी १० वाजता जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघतील.



त्यानंतर २९ ऑगस्ट रोजी ते मुंबईतील आझाद मैदानात पोहोचतील, असे त्यांनी आज एका पत्रकार परिषदेत सांगितले. आरक्षण न दिल्यास सरकार उलथवून टाकेन, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मनोज जरांगे आपल्या मुंबईकडे जाण्याच्या मार्गाची माहिती देताना म्हणाले, आम्ही बुधवारी सकाळी १० वा. आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघणार.

त्यानंतर महाकाळा, शहागड, शहागड चौक, वडीगंधारी फाटा, डोंगलगाव फाटा, साष्ट पिंपळगाव, बळेगाव, आपेगाव फाटा, हिरडपुरी, आंबेटाकळी, नवगाव, तुळजापूर, वडवळी, आपेगाव माउलींचे, वाघाडी, पैठण, उंचेगाव, पाटेगाव, तळणी, शेवगाव, वडुली, मळेगाव, मिरी नाका, पांढरी पूल, अहिल्यानगरच्या बायपासमार्ग कल्याण फाट्यावर जाणार. तेथून पुढे आळेगाव, नारायण गाव आणि २७ ऑगस्ट रोजी जुन्नर येथील शिवनेरी गडावर पोहोचणार आहेत.

२८ ऑगस्ट रोजी सकाळी शिवनेरी गडावरील पवित्र माती कपाळावर लावून राजगुरू खेड मार्गे आपण चाकणला जाऊ. तेथून तळेगाव, लोणावळा, पणवेल, वाशी, चेंबूर मार्गे २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी आपण आझाद मैदानाला पोहोचणार. त्यानंतर २९ ऑगस्ट रोजी सकाळपासून आपले आझाद मैदानावर उपोषण सुरू होईल, असे जरांगे यांनी सांगितले.

**१० टक्के आरक्षण कधीही जाऊ शकते**

सरकारकडून देण्यात आलेले १० टक्के आरक्षण कधीही जाऊ शकते. आम्हाला आमच्या हक्काची जमीन द्या, भाड्याने घर देऊ नका, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली.

दीडशे वर्षांपूर्वी आमच्या नोंदी आहेत, पण सग्यासोयऱ्यांचा आदेश काढून दीड वर्ष झाली तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मराठा अजूनही संयमी आहे, त्याची व्याख्या देण्यात आली आहे.

**सगेसोयरेची अंमलबजावणी का?**

सगेसोयरे का घ्यायचे यासाठी तीन-चार पॅराग्राफ त्यांनी केलेले आहेत. आम्ही त्यांना सांगितले होते, आमचे शब्द घ्या. पुन्हा पुन्हा घोळ होईल. पण तुम्ही प्रत्येकवेळी ते शब्द घ्यायला टाळत आहात. ज्यांची कुणबी नोंद सापडली, त्यांचे सगेसोयरे घ्यायचे. कारण त्याची पोटजात-उपजात म्हणून ते घ्यायचे आहेत.

आता आंदोलन खूप पुढे गेलेले आहे. आम्ही निघण्याच्या तयारीत आहोत, म्हणून शेवटचे सांगतो. आताही तुमच्या हातात दोन दिवस आहेत. महाराष्ट्रातील मराठे वेठीस धरू नये, असा इशारा मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला.

तुम्ही सरकार आहात आणि सरकारने राज्य अस्थिर करू नये. राज्य अस्थिर करण्याच्या राज्याचा प्रमुखाला अधिकार नाहीये. सरकार आडमुठ्याच्या भूमिकेत जाणार असेल, तर ही देशासाठी आणि राज्यासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. मराठ्यांचे असून देत नाही, म्हणजे आडमुडे मराठे नाही तर सरकार आहे, असेही मनोज जरांगे म्हणालेत.

कायद्यात बसणारे आरक्षण आम्हाला हवे आहे. न बसणा?या 29 जाती फडणवीस यांनी ओबीसी आरक्षणात घालून त्यांनी खुन्नस दाखवली आहे. सरकारकडूनच नेमण्यात आलेल्या शिंदे समितीकडून 58 लाख कुणबी नोंदी सापडल्या होत्या. समिती सुद्धा तुमचीच होती. समितीचा अहवाल सुद्धा स्वीकारण्यात आला, तर मग आडमुठे कोण? असा सवालही मनोज जरांगेंनी केला.

कुणबी आणि मराठा एकच आहे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आम्हाला सातारा, बॉम्बे गॅझेट लागू करावे. सरकारने मराठ्यांचा विषय समजून घेतला पाहिजे. आमची ही आमची जमीन आहे हे आम्हाला भक्कम माहीत आहे, असे मनोज जरांगे म्हणालेत.

## मोदींची पदवी सार्वजनिक केली जाणार नाही

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बीए पदवी सार्वजनिक करण्याचा केंद्रीय माहिती आयोगाचा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. आता दिल्ली विद्यापीठाला पंतप्रधानांची पदवी दाखवावी लागणार नाही.

सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सचिन दत्ता यांनी डीयूच्या याचिकेवर सुनावणी केली. तथापि, संपूर्ण आदेशाची प्रत अद्याप आलेली नाही. एका आरटीआय कार्यकर्त्याने दाखल केलेल्या याचिकेवर, सीआयसीने दिल्ली विद्यापीठाला १९७८ मध्ये बीए परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड सार्वजनिक करण्याचे आदेश दिले होते. पंतप्रधान मोदींनीही त्याच वर्षी परीक्षा उत्तीर्ण केली होती.

आरटीआय कार्यकर्त्याची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील संजय हेगडे यांनी युक्तिवाद केला, प्रत्येक विद्यापीठ मागितलेली माहिती सार्वजनिक करते. ती अनेकदा सूचना फलकावर, विद्यापीठाच्या वेबसाइटवर आणि कधीकधी वर्तमानपत्रांमध्ये देखील प्रकाशित केली जाते.

डीयूच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आपली बाजू मांडली आणि सांगितले की, माहिती अधिकाराद्वारे माहिती मिळविण्यासाठी केवळ कुतूहल हा आधार मानला जाऊ शकत नाही. सीआयसीने म्हटले होते, पदवी तपशील हा एक सार्वजनिक दस्तऐवज आहे

हे प्रकरण २०१६ मध्ये सुरू झाले, जेव्हा आरटीआय कार्यकर्ते नीरज कुमार यांनी डीयूमधून १९७८ मध्ये बीए उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची नावे, रोल नंबर, गुण आणि पास-फेल तपशील मागितले होते. पंतप्रधान मोदींनीही त्याच वर्षी बीए उत्तीर्ण झाल्याचा उल्लेख आहे. विद्यापीठ ही एक सार्वजनिक संस्था असल्याने आणि पदवी तपशील सार्वजनिक दस्तऐवज मानले जातात, त्यामुळे सीआयसीने ही माहिती सार्वजनिक करण्याचे आदेश दिले होते.

डीयूने या आदेशाला आव्हान दिले आणि म्हटले की, विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती विश्वासू क्षमता (विश्वासात ठेवलेली गोपनीय माहिती) अंतर्गत येते आणि ती अनोळखी व्यक्तीला देता येत नाही. विद्यापीठाने असेही म्हटले आहे की, त्यांना न्यायालयाला रेकॉर्ड दाखवण्यास कोणताही आक्षेप नाही, परंतु ते सार्वजनिक केले जाऊ शकत नाही.

## हिमाचलच्या सीएमविरोधात विशेषाधिकार प्रस्ताव

■ **वृत्तसंस्था, शिमला, दि. २५ :**
धर्मशालाचे भाजप आमदार सुधीर शर्मा यांनी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुखू यांच्याविरुद्ध विशेषाधिकार प्रस्ताव आणला आहे. सुधीर शर्मा यांनी मुख्यमंत्र्यांवर सभागृहात वारंवार खोटे बोलत असल्याचा आरोप केला आहे. त्यांनी यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहिले आहे.



यावर विधानसभा अध्यक्ष कुलदीप सिंह पठानिया म्हणाले, सुधीर यांनी ते लेखी स्वरूपात दिले आहे. आम्ही त्याची तपासणी करत आहोत. नियमांनुसार कारवाई केली जाईल.

सुधीर यांनी पत्रात लिहिले आहे की, २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात मुख्यमंत्र्यांनी २५ हजार तरुणांना रोजगार देण्याविषयी बोलले होते.

## श्री गुरु ग्रंथ साहिबची लुधियानात विटंबना

■ **वृत्तसंस्था, लुधियाना, दि. २५ :**
पंजाबमधील लुधियाना येथील श्री गुरुद्वारा साहिबमध्ये अपवित्रतेची घटना समोर आली आहे. एका महिलेने तिचे कपडे काढून श्री गुरु ग्रंथ साहिबसमोर फेकले. तिथे प्रार्थना करण्यासाठी आलेल्या लोकांनी तिला काही प्रकारे रोखण्याचा प्रयत्न केला, पण तिने ऐकले नाही आणि गोंधळ सुरूच ठेवला.

यानंतर, संगत घटनास्थळी पोहोचली आणि महिलेला ताब्यात घेतले. महिलेने तिच्या पतीसमोर हे कृत्य केले. श्री गुरुद्वारा साहिबमध्ये बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली.

# गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर व त्यांनी घेतलेल्या भूमिकेवर वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एक्सवर ट्विट करत आंबेडकर म्हणाले, जरांगे, तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत.

**प्रकाश आंबेडकरांची जरांगेंवर टीका**



पुढे प्रकाश आंबेडकर म्हणाले, अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असतांना सत्तेत सर्व प्रस्थापित मराठा होते. शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात हे सर्व प्रस्थापित मराठे सत्तेत होते. तुम्ही निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले. तुम्ही गरीब मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण, गरीब मराठ्यांना वंचित ठेवणा?या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## खोटे खटले दाखल करणाऱ्या मंत्र्याला किती शिक्षा होणार?

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
गृहमंत्री अमित शहा यांनी आज सांगितले की, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तुरुंगात जाऊनही राजीनामा दिला नाही. यावर केजरीवाल म्हणाले की, आज दिल्लीतील लोकांना त्यांच्या तुरुंगातील सरकारची आठवण येत आहे. कारण गेल्या सात महिन्यांत भाजपने दिल्लीची अवस्था आणखी बिकट केली आहे.



केजरीवाल म्हणाले, जेव्हा केंद्राने मला राजकीय कट रचून खोट्या प्रकरणात अडकवले आणि तुरुंगात पाठवले, तेव्हा मी १६० दिवस तुरुंगातून सरकार चालवले. किमान तुरुंग सरकारच्या काळात वीज कपात झाली नाही, पाणी उपलब्ध होते.

ते म्हणाले, रुग्णालये आणि मोहल्ला क्लिनिकमध्ये मोफत औषधे उपलब्ध होती, मोफत चाचण्या केल्या जात होत्या, एका पावसानंतर दिल्लीची स्थिती इतकी वाईट झाली नसती, खासगी शाळांना मनमानी आणि गुंडगिरीने वागण्याची परवानगी नव्हती.

पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना अटक झाल्यानंतर पदावरून हटवण्याची परवानगी देणाऱ्या विधेयकावर आपचे संयोजक केजरीवाल यांनीही प्रतिक्रिया दिली.

त्यांनी शहा यांना विचारले की, जर एखाद्यावर खोटा खटला दाखल केला गेला आणि त्याला तुरुंगात पाठवले गेले आणि नंतर तो निर्दोष सुटला तर त्याच्यावर खोटा खटला दाखल करणाऱ्या मंत्र्याला किती वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागेल?

## लक्ष्मण हाके आणि पंडितांच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. २५ :**
बीड जिल्ह्यातील गेवराई येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि आमदार विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी करत राडा झाल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर चप्पल फेकले. लक्ष्मण हाके गेवराईत दाखल होताच हा गोंधळ झाला.

आमदार विजयसिंह पंडितांनी 'चलो मुंबई' असे बॅनर लावल्याने लक्ष्मण हाके यांच्याकडून वादग्रस्त विधान करण्यात आले होते. त्यानंतर लक्ष्मण हाके हे गेवराई येथे येताच विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत हाकेंच्या कार्यकर्त्यांवर चपला फेकल्या.

तसेच हाकेंच्या कार्यकर्त्यांनी देखील चप्पल फेकल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी दोन्हीकडील कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. हाके गेवराई येथे येताच हा प्रकार घडला.

## शहा यांच्या रेड्डींवरील टिप्पणीला १८ न्यायाधीशांनी म्हटले दुर्दैवी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधी पक्षाचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांच्यावरील वक्तव्यावर निवृत्त न्यायाधीशांनी टीका केली आहे.



शहा यांनी रेड्डींवर नक्षलवादाला पाठिंबा देण्याचा आरोप केला आहे, ज्याला माजी न्यायाधीशांनी दुर्दैवी म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे की, उपराष्ट्रपती पदाचा आदर करणे शहाणपणाचे ठरेल. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या निवृत्त न्यायाधीशांच्या गटाने, ज्यामध्ये माजी न्यायाधीश न्यायमूर्ती कुरियन जोसेफ, न्यायमूर्ती मदन बी लोकूर आणि न्यायमूर्ती जे चेलमेश्वर यांचा समावेश होता, असे म्हटले आहे की सलवा जुडूमचा निकाल स्पष्ट किंवा अप्रत्यक्षपणे नक्षलवाद किंवा त्याच्या विचारसरणीला समर्थन देत नाही. ते म्हणाले, उपराष्ट्रपती पदासाठीचा प्रचार वैचारिक असू शकतो, परंतु तो सभ्यतेने आणि प्रतिष्ठेने चालवता येतो. कोणत्याही उमेदवाराच्या तथाकथित विचारसरणीवर टीका करणे टाळले पाहिजे.

अमित शहा यांनी २२ ऑगस्ट रोजी केरळमध्ये म्हटले होते की, 'सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुदर्शन रेड्डी हे तेच व्यक्ती आहेत, ज्यांनी नक्षलवादाला मदत केली होती. त्यांनी सलवा जुडूमवर निकाल दिला. जर सलवा जुडूमवर निकाल आला नसता तर २०२० पर्यंत नक्षलवादी अतिरेकीपणा संपला असता.'

निवृत्त न्यायाधीशांच्या एका गटाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, एका उच्च राजकीय अधिकाऱ्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पक्षपातीपणे चुकीचे अर्थ लावल्याने न्यायाधीशांवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याला हानी पोहोचू शकते. निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश ए.के. पटनायक यांच्यासह अनेकांचा समावेश आहे.

## अपघातात ८ भाविक ठार

**४३ जण जखमी**

■ **वृत्तसंस्था, बुलंदशहर, दि. २५ :**
उत्तर प्रदेशातील बुलंदशहरमध्ये एक रस्ते अपघात झाला. येथे एका कंटेनरने भाविकांनी भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला मागून धडक दिली. त्यामुळे ट्रॅक्टर उलटला. या अपघातात ८ भाविकांचा मृत्यू झाला. ४३ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ३ जणांची प्रकृती गंभीर आहे.

मृतांमध्ये ६ वर्षांचा एक मुलगा, ४ पुरुष आणि ३ महिलांचा समावेश आहे. राष्ट्रीय महामार्ग ३४ वरील अर्निया परिसरातील घाटाल गावाजवळ रविवारी रात्री २ वाजता हा अपघात झाला. भाविक कासगंजहून राजस्थानमधील गोगामेडी येथे जहारबीर (गोगाजी) दर्शनासाठी जात होते. कंटेनरचा चालक पळून गेला. कंटेनर भाताच्या भुश्शाने भरलेले होते.

अपघातानंतर, ट्रॅक्टर ट्रॉली रस्त्यावरून हटवण्यासाठी क्रेन मागवण्यात आली. जखमींना अलिगड मेडिकल कॉलेज, बुलंदशहर जिल्हा रुग्णालय आणि खुर्जा येथे दाखल करण्यात आले आहे.

माहिती मिळताच डीएम श्रुती आणि एसएसपी दिनेश कुमार सिंह घटनास्थळी पोहोचले. एसएसपींनी सांगितले की, १० जखमींना बुलंदशहर जिल्हा रुग्णालयात आणि २३ जणांना खुर्जा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. १० जखमींना अलीगढ मेडिकल कॉलेजमध्ये रेफर करण्यात आले आहे. महामार्गावरून ट्रॅक्टर हटवल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

मृतांची ओळख पटली असून, त्यात ईयू बाबू (४०), रामबेटी (६५), चांदनी (१२), घनीराम (४०), मोक्षी (४०), शिवांश (६), योगेश (५०), विनोद (४५) हे सर्वजण कासगंजचे रहिवासी आहेत.

# अमितची मते सावंतांनी, देशपांडेंची मते आदित्यनी चोरली का?

राज ठाकरेंच्या मतचोरीच्या आरोपावर शेलारांचा हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
राज ठाकरे यांनी केलेल्या मतचोरीच्या आरोपांवरून आशिष शेलार यांनी टीका केली आहे. माहीम मतदारसंघात अमित ठाकरे यांची मते महेश सावंत यांनी चोरली का? याचे उत्तर राज ठाकरेंनी द्यावे, असे आशिष शेलार म्हणालेत.

त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीतील 'भोपळा' फ्रेम करुन पाठवणार असल्याचे म्हटले आहे. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची निवड केली. यानंतर आशिष शेलार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर मतचोरीच्या आरोपावरुन आणि बेस्ट पतपेढीच्या निकालावरून जोरदार टीका केली.

नेमके काय म्हणाले आशिष शेलार? शेलार यांनी उपरोधिकपणे म्हटले की, मी ठाकरे बंधूंना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीच्या निकालाची फ्रेम करुन पाठवणार आहे. त्या फ्रेममध्ये फक्त भोपळा असेल. राज ठाकरे यांनी नुकताच पुण्यात झालेल्या मनसेच्या मेळाव्यात विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी झाल्याचा आरोप केला होता. यावर पलटवार करताना शेलार यांनी राज ठाकरेंना थेट आव्हान दिले.



**उबाठाने एकट्याने लढून दाखवावे**

शेलार यांनी ठाकरे गटावर मुंबई मनपा निवडणुकीच्या प्रभाग रचनेबद्दल टीका केली. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेवरुन ठाकरे गटाकडून रडगाण्याचा बँड का वाजवला जात आहे? हिंमत असेल तर उबाठाने एकट्याने लढून दाखवावे, असेही शेलार यावेळी म्हणाले.

जर मतचोरी झाली असेल तर विधानसभा निवडणुकीत माहिम मतदारसंघात अमित ठाकरे यांची मते महेश सावंत यांनी चोरली आहेत का? तसेच, मनसेचे मुंबई विभाग अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्या मतांची चोरी आदित्य ठाकरे यांनी केली आहे का? या प्रश्नांची राज ठाकरेंनी उत्तरे द्यावीत, असे शेलार यांनी म्हटले.

याच पत्रकार परिषदेत, आशिष शेलार यांनी अमित साटम यांच्या नवीन नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले की, एक तरुण आणि संघर्षशील नेता मुंबई भाजपचा अध्यक्ष झाल्याने त्यांना आनंद आहे. साटम यांनी नगरसेवक, आमदार आणि कार्यकर्ता म्हणून केलेल्या कामाची प्रशंसा करत, त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपची वाटचाल यशस्वी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# संजय शिरसाटांचा राजीनामा घ्या

## रोहित पवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर बिवलकर कुटुंबाला जमीन दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी बॅगभर पुरावे सादर केले. रोहित पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणाची दखल घेण्याचे आवाहन केले, तसेच संजय शिरसाट यांच्यावर तात्काळ कारवाई करून त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली. पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी बिवलकर कुटुंबांचा १९९३ चा अर्ज, सिडकोने फेटाळलेले आधीचे चार अर्ज, विधी व न्याय विभागाचा अहवाल, नगर विकास विभागाने १ मार्च २०२४ ला सिडकोला दिलेले पत्र, सिडकोचा ठराव आणि सिडकोचे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र असे पुरावे माध्यमांसमोर दाखवले. रोहित पवार म्हणाले, बिवलकर कुटुंबाचा साडेबारा टक्क्यासाठी अर्ज २८ जुलै १९९३ आला होता. या अर्जात त्यांनी सांगितले की, आम्ही चुकीचे ठरलो, तर आम्ही पूर्ण जमीन सिडकोला देणार आहोत. तांत्रिकदृष्ट्या पाहिल्यास बिवलकर कुटुंब चुकीचेच ठरलेले आहेत. रोहित पवार यांनी सिडकोने बिवलकरांचा अर्ज चार वेळा फेटाळल्याचे सांगितले. ते म्हणाले, १८ एप्रिल १९९४ रोजी पहिल्यांदा अर्ज फेटाळला. त्यानंतर १९९५ आणि २०१० मध्ये आधीचे कारण देत सिडकोने बिवलकर कुटुंबाचा अर्ज फेटाळून लावला.

# वैभव खेडेकर यांची मनसेतून हकालपट्टी



**मुंबई :** मनसेचे कोकण संघटक तथा राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर यांची अखेर मनसेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांच्यावर पक्षविरोधी कारवाया करण्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. आज सकाळपासूनच वैभव खेडेकर हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची साथ सोडून भाजपत जाण्याची चर्चा सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर मनसेने तातडीने ही कारवाई केली आहे. मनसेने वैभव खेडेकर यांच्यासह राजापूरच्या अविनाश सौंदळकर, चिपळूनच्या संतोष नलावडे व माणगावच्या सुबोध जाधव या तिघांचीही पक्षातून हकालपट्टी केली आहे. सदर पदाधिका?यांना पक्षाच्या नियमांचे आणि धोरणांचे उल्लंघन केल्यामुळे, तसेच पक्षविरोधी कार्य केल्यामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने पक्षातून बडतर्फ करण्यात येत आहे. तरी मनसेच्या सर्वच पदाधिकारी व महाराष्ट्रसैनिकांनी याची नोंद घ्यावी, असे मनसेने आपल्या यासंबंधीच्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर मनसे नेते संदीप देशपांडे व अविनाश जाधव यांची स्वाक्षरी आहे.

# राज ठाकरेंच्या मतचोरीच्या आरोपावर आशिष शेलारांचा हल्लाबोल



**मुंबई** : राज ठाकरे यांनी केलेल्या मतचोरीच्या आरोपांवरून आशिष शेलार यांनी टीका केली आहे. माहीम मतदारसंघात अमित ठाकरे यांची मते महेश सावंत यांनी चोरली का? याचे उत्तर राज ठाकरेंनी द्यावे, असे आशिष शेलार म्हणालेत. तसेच त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीतील 'भोपळा' फ्रेम करुन पाठवणार असल्याचे म्हटले आहे. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची निवड केली. यानंतर आशिष शेलार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर मतचोरीच्या आरोपावरुन आणि बेस्ट पतपेढीच्या निकालावरून जोरदार टीका केली. शेलार यांनी उपरोधिकपणे म्हटले की, मी ठाकरे बंधूंना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीच्या निकालाची फ्रेम करुन पाठवणार आहे. त्या फ्रेममध्ये फक्त भोपळा असेल. राज ठाकरे यांनी नुकताच पुण्यात झालेल्या मनसेच्या मेळाव्यात विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी झाल्याचा आरोप केला होता. यावर पलटवार करताना शेलार यांनी राज ठाकरेंना थेट आव्हान दिले.

# मनोज जरांगेंना बैठक घेण्यासाठी आमदार १०-१५ लाख रुपये देतात

## लक्ष्मण हाकेंचा गंभीर आरोप



**अकोला :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आता 29 ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. त्याआधी बीडमध्ये त्यांनी इशारा सभा घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येत आहोत, तेव्हा काय करायचे ते करा, असे म्हणत आव्हान केले आहे. आता मनोज जरांगे यांच्यावर ओबीसी नेते लक्ष्मण हके यांनी जोरदार टीका केली आहे. मनोज जरांगेंची मतदारसंघात बैठक घेण्यासाठी आमदार त्यांना 10-15 लाख रुपये देतात, असा आरोप हाके यांनी केला आहे. अकोला येथे माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे यांचा मोर्चा हा सरकार पुरस्कृत आहे, मनोज जरांगेंची मतदारसंघात एक बैठक घेण्यासाठी आमदार त्यांना 10 ते 15 लाख रुपये देतात. जरांगेंना आमदार पैसे देतात, यामुळेच मराठवाड्यातल्या छोट्या छोट्या गावातही जरांगेंची मोठमोठी बॅनर्स आणि पोस्टर्स लागल्याचे हाके म्हणाले.

# आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून देणात येणाऱ्या सेवा आता व्हॉट्सॲपच्या माध्यमातून द्याव्यात : मुख्यमंत्री



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
राज्य शासनाच्या विविध विभागांकडून नागरिकांना सेवा पुरवल्या जातात. या सेवांसाठी आपले सरकार हे पोर्टल असून या पोर्टलवरील सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पुरवण्यात याव्यात. तसेच सर्व सेवा योग्यप्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्याच्या दृष्टीने सर्व तालुक्यांमध्ये एक रिंग तयार करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी सेवा सुलभीकरणासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज राज्यातील नागरिक सेवांसंदर्भात आढावा बैठक घेतली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकाच प्रकारच्या 9 सेवा एकत्र करण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे पडताळणी करण्यात यावी, तसेच अर्ज प्रक्रियेत लागणारी कागदपत्रांची संख्या लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी नियोजन करावे. सर्व जिल्हा परिषद, महापालिका आणि विद्यापीठांचे डॅशबोर्ड एकसमान असावेत, जेणेकरून राज्यभरातील नागरिकांना एकसंध अनुभव मिळेल, या सेवेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रिंग व क्लस्टर प्रणाली राबवण्यात यावी. रिंगमध्ये सुरवातीस त्या तालुक्यातील १० ते १२ गावांचा समावेश असावा व गरजेनुसार सेवा पुरवण्यात याव्यात. या रिंगच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र गट व व्यवस्थापन टीम तयार करावी. तसेच सेवा पुरवण्यासाठी डिश डिजिटल सेवा हबचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सेवा वितरणात अपीलची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आणि प्रमाणपत्र वितरणासाठी मल्टी-मॉडेल प्रणाली (जसे की ईमेल, पोर्टल, व्हॉट्सअ?प) वापरण्याच्या सूचना दिल्या. आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून सध्या राज्यात 1001 सेवा पुरवण्याचे काम सुरू असून त्या पैकी ९९७ सर्व पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसामध्ये पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सेवांमध्ये २३६ सेवांची वाढ झाली आहे.

राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया, महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर आदी यावेळी उपस्थित होते.

# बदनामी सहन न झाल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २५ :**
नाशिकमध्ये एका अल्पवयीन मुलीने बदनामीमुळे टोकाचे पाऊल उचलल्याची घटना घडली आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीला जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास सांगून तसेच सततच्या त्रासाला कंटाळून व सोशल मीडियावर फोटो टाकत बदनामी केल्याने या विद्यार्थिनीने गळफास घेत आत्महत्या केली आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्याच कॉलेजमध्ये शिकणाऱ्या गणेश भांगरे (वय 20, रामटेकडी झोपडपट्टी तपोवन) अक्षय मदन वरठे (वय 21, रामटेकडी झोपडपट्टी तपोवन) अतिष राजकुमार वैद्य यांनी मयत मुलीच्या गळ्यात हात घालून काढलेला फोटो इन्स्टाग्रामवर पोस्ट करत समाजात बदनामी झाली. ही बदनामी सहन न झाल्याने तिने घरात गळफास घेत आत्महत्या केली. दोघे संशयित कॉलेजमध्ये वेळोवेळी येऊन तिला आरोपीसोबत जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास भाग पाडत होते.

# फडणवीस शिंदेंच्या खात्यावर नाराज नाहीत

## अजित पवारांची स्पष्टोक्ती

■ **महासागर प्रतिनिधी कोल्हापूर, दि. २५ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील नगरविकास खात्यावर नाराज असल्याचा दावा केला जात आहे. पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे. मुख्यमंत्री नगरविकास खात्यावर नाराज असल्याची माहिती धांदात खोटी आहे, असे ते म्हणालेत. दरम्यान, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार उद्या गणेशोत्सवापूर्वी जमा होणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.



केंद्र सरकारच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात नगरविकास खाते अपयशी ठरल्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचा दावा केला जात आहे. पत्रकारांनी सोमवारी हा मुद्दा कोल्हापूरच्या दौऱ्यावर असणाऱ्या अजित पवारांपुढे उपस्थित केला. तसेच त्यांची प्रतिक्रिया विचारली. त्यावर अजित पवारांनी मुख्यमंत्री नगरविकास खात्यावर नाराज असल्याची तुम्हाला मिळालेली माहिती धादांत खोटी आहे, असे जोर देऊन सांगितले. तसेच यासंबंधीच्या सर्वच प्रतिक्रिया जोरकसपणे फेटाळून लावल्या. अजित पवारांनी यावेळी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार गणेशोत्सवापूर्वी होणार असल्याचेही सांगितले.

या वर्षी आम्ही गणेशोत्सवापूर्वी म्हणजे उद्या (26 ऑगस्ट) रोजी शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन देण्याचा जीआर काढला आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील सर्वच शासकीय कर्मचाऱ्यांना जे वेतन दिले जाते, तसेच पेन्शन दिली जाते, त्या सर्वांना उद्या 26 ऑगस्ट रोजी त्यांच्या खात्यांत त्यांचे वेतन जमा होईल, असे ते म्हणाले. निकृष्ट दजार्चे काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. तसेच 1445 कोटी रुपयांचा अंबाबाई मंदिर पुनर्विकास प्रकल्प पुढे सरकण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

# पुण्यात चार महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. २५ :**
पुणे शहरात पादचारी महिला यांना लक्ष्य करून दागिने, मोबाईल चोरी करणाऱ्या चोरट्यांनी धुमाकुळ घातला आहे. बिबवेवाडी, औंध, येरवडा, हडपसर भागात पादचारी महिलांचे दागिने चोरी केल्याच्या घटना घडल्या आहेत. दुचाकीस्वार चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेमध्ये पादचारी महिलांकडील तीन लाख ४० हजारांचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले.

औंधमधील गायकवाडनगर भागात पादचारी महिलेच्या गळ्यातील एक लाख दहा हजारांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार अनोळखी चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने चतुःशृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला औंधमधील गायकवाडनगर भागात राहायला आहेत. त्या रात्री गायकवाडनगर परिसरातून निघाल्या होत्या. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेले.तर येरवडा भागात एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील एक लाख रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. याबाबत ज्येष्ठ महिलेने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

# मुंबई भाजप अध्यक्षपदी अमित साटम

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची निवड केली. ते मंत्री आशिष शेलार यांची जागा घेतील. मुंबई महापालिका आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने साटम यांच्या खांद्यावर देशाच्या आर्थिक राजधानीची जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजपच्या मुंबई व महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची आज सकाळी मुंबईत बैठक झाली. या बैठकीत अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित साटम यांची मुंबईच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यानंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. भाजप अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तथा महाराष्ट्राचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वच पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी अमित साटम यांची करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी त्यांच्या नियुक्तीचे पत्र साटम यांना सुपूर्द केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना भाजप पूर्ण ताकदीने अमित साटम यांच्या पाठिशी उभी असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, मंत्री आशिष शेलार यांनी मुंबई विभागाचे अध्यक्षपद अतिशय समर्थपणे सांभाळले. 2017 च्या महापालिका निवडणुका किंवा लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी अतिशय उत्तमपणे काम केले. ते मंत्रिपदी असताना मंगलप्रभात लोढा यांनीही ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली. आशिष शेलार यांच्या नेतृत्वात भाजपने क्रमांक एकचा पक्ष म्हणून आपले वर्चस्व सिद्ध केले. आत्ता नवीन संघटनात्मक संरचनेत त्यांच्याकडे मंत्रिपदाचा भार आला आहे. त्यामुळे भाजपने मुंबईच्या अध्यक्षपदी अमित साटम यांची निवड केली आहे.

अमित साटम हे तीनवेळा आमदार म्हणून निवडून आलेत. त्यापूर्वी त्यांनी नगरसेवक म्हणूनही काम केले. त्यांनी यापूर्वी विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. विधानसभेत एक अभ्यासू व आक्रमक आमदार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. विशेषतः मुंबईच्या प्रश्नांची जाण व ते प्रश्न सोडवण्यासाठी जी कल्पकता हवी, ती कल्पकता त्यांच्याकडे आहे. त्यामुळे निश्चितपणे त्यांच्या नेतृत्वात भाजप मुंबईत आपली घौडदौड कायम राखेल. पुन्हा एकदा मुंबई महापालिकेत महायुतीचीच सत्ता येईल असा विश्वास मला आहे.

# गोरक्षणाच्या नावाखाली राज्यात मोठी लॉबी सुरू : सदाभाऊ खोत

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २५ :**
गोरक्षणाच्या नावाखाली राज्यात मोठी लॉबी सुरू असल्याचा आरोप रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनी केला आहे. तसेच यांचे कॉर्पोरेट ऑफिस आहेत. शेतकऱ्यांना याचा त्रास होत असून सरकारने याबाबत लक्ष घालून कारवाई करावी. यावर कारवाई केली नाही तर पोलिस स्टेशन समोर आम्ही जनावरांच्या छावण्या उभ्या करू, असा इशारा सदाभाऊ खोत यांनी दिला आहे.

सदाभाऊ खोत म्हणाले, गाई म्हशीमध्ये राहून आमची माय-बहिण, बाप शेण, दूध काढतो आणि हे गोरक्षक म्हणणारे मोठ्या मोठ्या कॉर्पोरेट ऑफिसमधून धंदा करत आहेत. सरकारला माझी विनंती आहे, की बाबा शेतकऱ्यांचा व्यवसाय अशाने मरून जाईल. गाड्या अडवल्या जातात त्यांना मारले जाते त्यामुळे यावर कारवाई करा. याबाबत मी मुख्यमंत्र्यांशीही बोलणार असल्याची माहिती सदाभाऊ खोत यांनी दिली आहे.

पुढे बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले, दोन महिन्यांपूर्वी सांगलीच्या



शेतकऱ्यांना मारहाण करून त्यांच्या दहा म्हशी जबरदस्तीने फुरसुंगीच्या गोशाळेत नेऊन ठेवल्याचे सांगितले होते. शेतकऱ्यांना न्यायालयात जाऊन मग या म्हशी परत मिळवण्यासाठी आदेश मिळाले होते. तो आदेश घेऊन शेतकरी गोशाळेत म्हशी घेण्यासाठी गेल्यावर म्हशी गोशाळेत नसल्याचे लक्षात आले. या प्रकरणात शेतकऱ्यांची ना दाद, ना फिर्याद, अशी परिस्थिती झालीय. त्यामुळे या गोरक्षकांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. थार सारख्या कॉर्पोरेट गाड्यामधून काही लोक पुण्या-मुंबईवरून येतात आणि आमच्या गोरक्षणाचे काम करत असल्याचे सांगतात. गोरे गुंठे असतात तुम्हाला कळत नाही, शहरात कुत्रे-मांजर बघितले यांच्याकडे गाई गोटे कुठून आले.

# मुंबईत पुन्हा पावसाच्या जोरधारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
मुंबई व उपनगरांत आज पहाटेपासूनच मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. या पावसामुळे शहरातील सखल भागांतील रस्ते व वसाहतींत पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. विशेषतः याचा मुंबईची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या लोकलसेवेलाही फटका बसल्यामुळे सकाळच्यावेळी आपल्या कार्यालयांच्या दिशेने निघालेल्या चाकरमान्यांची पुरती दैना झाली आहे.

दरम्यान, कोकणातील रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबईतील अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहीसर, विलेपार्ले, सांताक्रूझ, वांद्रे आदी भागांत जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळे पश्चिम उपनगरातील सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. पूर्व उपनगरातही पावसाची रिपरिप सुरू आहे. नवी मुंबई परिसरातही पावसाची संततधार सुरू आहे. पण मुंबई पश्चिम उपनगरांत 2 दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने आज जोरदार पुनरागमन केले आहे.

# लाडकी बहीण योजनेत गैरव्यवहार

## छाननीनंतर योग्य कारवाई करण्यात येणार : अदिती तटकरे

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या काळात महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना काढली आणि याचा चांगलाच फायदा निवडणुकीत झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु, आता या योजनेचा लाभ काही अपात्र लोकांनी देखील घेतला असल्याचे समोर आले आहे. तब्बल 26 लाख लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र नसल्याचे समोर आले आहे. याबाबत महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.

अदिती तटकरे यांनी ट्विट करत माहिती दिली की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थींपैकी सुमारे 26 लक्ष लाभार्थी योजनेच्या



निकषानुसार पात्र दिसून येत नसल्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राथमिक माहिती उपलब्ध करुन दिली होती. सदर सुमारे 26 लक्ष लाभार्थी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आहेत.

त्यानुसार महिला व बालविकास विभागाने सदर लाभार्थींची प्राथमिक माहिती संबंधित जिल्हा यंत्रणेला छाननीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार हे लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र ठरतात किंवा नाही याबाबतची सुक्ष्म छाननी क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. छाननीअंती या लाभार्थींची पात्रता/अपात्रता स्पष्ट होणार आहे.

छाननीअंती जे लाभार्थी अपात्र ठरतील त्यांच्याबाबत माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य कारवाई करण्यात येईल, तसेच पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ यापुढेही पुववंत सुरु राहील, अशी माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे.

दरम्यान, यावर राज्याचे अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अपात्र आढळलेल्या महिला लाभार्थींना फक्त योजनेतून बाहेर काढले जाईल.

# संभाजीनगर अभियंता कार्यालयावर ठाकरे गटाचा मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी संभाजीनगर, दि. २५ :**
महाराष्ट्रातील वीज ग्राहकांवर वीज बिल, स्मार्ट मीटर, वीज जोडणी- तोडणीसंदर्भात अन्यायकारक अधिभार लावून फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेना उद्धव ठाकरे गट आक्रमक झाला आहे.

शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज सोमवार २५ ऑगस्ट रोजी वीज वितरण कंपनीवर धडक मारली. संभाजीनगर जिल्हा मुख्य अभियंत्यांना शिवसैनिकांनी निवेदन यावेळी सोपविले. या निवेदनाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी शिवसैनिकांनी दिला आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ८५४ इतकी होत आहे. त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जात असल्याचे शिवसैनिकांनी यावेळी मुख्य अभियंत्यांना



सांगितले.

उर्जा शुल्क, वहन शुल्क, प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याची योजना प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याची बाब या पत्राद्वारे शैक्षणिक आणि निदर्शनास आणून दिली.

राज्यातील ग्राहकांच्या हितरक्षणाकरिता शासनाने तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याची मागणी या पत्राद्वारे केली. घरगुती ग्राहकांच्या वीज देयकातील सर्व अधिभारांचे पारदर्शक व तपशीलवार स्पष्टीकरण सार्वजनिक करावे, शंभर युनिटपर्यंत वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी अधिभार व स्थिर शुल्कावर मर्यादा घालून संरक्षित दर लागू करावेत, स्मार्ट मीटर संदर्भातील सर्व तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावेत, औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे अधिभार घरगुती ग्राहकांवर टाकले जाणार नाहीत, याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत, विलंबाने देयक भरल्यास घरगुती ग्राहकांचे विद्युत कनेक्शन तात्काळ तोडण्याऐवजी किमान पंधरा दिवसांची मुदत द्यावी, दरवाढ निश्चित करताना विद्युत निर्मिती खर्च, इंधन खर्च व वाहतूक खचार्चा तपशीलवार हिशेब घेऊनच निर्णय घ्यावा, इंधन समायोजन अधिभार व इतर आकारणीच्या माध्यमातून जादा वसुल झाल्यास ती रक्कम पुढील देयकात कपात करून ग्राहकांना परत करावी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सार्वजनिक सुनावणीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक प्रतिनिधींना अनिवार्यपणे सामावून घेण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कृषी ग्राहकांना अधिभारातून सवलत देऊन त्यांच्या कनेक्शन तोडण्यापूर्वी किमान तीस दिवसांची मुदत देण्यात यावी, स्मार्ट मीटर भारतीय मानक ब्युरो प्रमाणित असल्याची खात्री करून, चुकीच्या देयकाबाबत ग्राहकांना तातडीने भरपाई मिळण्याची तरतूद करावी व गरीब व मध्यमवर्गीय घरांकरिता विशेष सवलतीचे दरपत्रक लागू करावे.

# गणरायाच्या सजावटीसाठी आकर्षक माळा,मखराने सजला बाजार

**अकोला :** श्री गणेशाची स्थापना बुधवारी होणार आहे. आज मात्र बाजारात देखील धूम दिसून येत आहे. विविध प्रकारचे मखर, आकर्षक फुलांच्या माळा, तोरणे तसेच सजावटीच्या वस्तू बाजारात उपलब्ध आहेत. ग्राहकांची देखील वाढती मागणी आहे. बाजारात रौनक दिसून येते.घरात तसेच सार्वजनिकगणेशोत्सव मंडळाकडून श्री गणेशाची स्थापना अतिशय भक्तीने तसेच हर्षोल्हासात केली जाते. दहा दिवसांच्या



उत्सवात गणरायाची आराधना केली जाते. विघ्नहर्त्या च्या आगमनाची वाट गणेशभक्तांना असते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारले आहेत. तसेच मोठ्या गणेश मूर्ती मंडपात आणून ठेवल्या आहेत. धुमधडाक्यात आगमन सोहळे होत आहेत. श्री गणेशाची स्थापना बुधवारी होणार आहे. आज मात्र बाजारात देखील धूम दिसून येत आहे. विविध प्रकारचे मखर, आकर्षक फुलांच्या माळा, तोरणे तसेच सजावटीच्या वस्तू बाजारात उपलब्ध आहेत. ग्राहकांची देखील वाढती मागणी आहे. बाजारात रौनक दिसून येते.

# कीटकनाशक फवारणी दक्षतेबाबत कृषी विभागाची जनजागृती मोहिम

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** पिकांवर कीटकनाशक फवारणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत कृषी विभागामार्फत विशेष जनजागृती मोहिम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत चित्ररथाचा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ आज झाला.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, कृषी विकास अधिकारी महेंद्र साल्के आदी उपस्थित होते. फवारणीदरम्यान विषबाधा रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत सहजसुलभ भाषेत शेतक-यांना माहिती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.फवारणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत जनजागृती व कार्यवाहीबाबत बैठकीतही सूचना देण्यात आल्या. कीटकनाशक फवारणी





करताना शेतकऱ्यांनी सुरक्षा साधने वापरणे बंधनकारक आहे. यामध्ये हातमोजे, डोळ्यांसाठी चष्मा, तोंडावर मास्क आणि संपूर्ण शरीर झाकणारे ॲप्रॉन यांचा समावेश आहे.

ही साधने वापरल्यास कीटकनाशकांचा त्वचेशी थेट संपर्क टाळता येतो.शेतकऱ्यांनी सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळीच फवारणी करावी. कडक उन्हात फवारणी केल्यास विषबाधेचा धोका वाढतो. तसेच, वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. सूचनांचे पालन कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करण्यापूर्वी त्यावरील लेबल आणि वापरण्याच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

सांगितलेल्या मात्रेतच कीटकनाशकाचा वापर करावा. लहान मुलांना दूर ठेवा फवारणी चालू असताना लहान मुलांना आणि पाळीव प्राण्यांना शेतापासून दूर ठेवावे.जर एखाद्या शेतकऱ्याला फवारणी करताना विषबाधेची लक्षणे (उदा. चक्कर येणे, मळमळ होणे, जाणवली, तर त्यांनी तात्काळ फवारणी थांबवून जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा डॉक्टरांशी संपर्क साधावा. फवारणीच्या औषधाचे लेबल डॉक्टरांना दाखवावे,

स्वच्छतेची काळजी फवारणी पूर्ण झाल्यावर हात पाय आणि चेहरा साबणाने स्वच्छ धुवावा. वापरलेली सुरक्षा साधनेही स्वच्छ करून सुरक्षित ठिकाणी ठेवावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व कृषी विकास अधिका-यांतर्फे करण्यात आले.

# गौरी-महालक्ष्मींचे आकर्षक मुखवटे बाजारपेठेत दाखल

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** हरतालिकेचा सण जवळ आल्याने, गणेशोत्सवाच्या तयारीलाही वेग आला आहे. विशेषतः गौरी - महालक्ष्मीच्या आगमनाची तयारी जोरात सुरू झाली आहे. यावर्षी बाजारपेठेत विविध आकर्षक आणि नावीन्यपूर्ण गौरी-महालक्ष्मीचे मुखवटे दाखल झाले आहेत. रंगीबेरंगी साड्या, आकर्षक दागिने आणि विविध चेहऱ्यांचे भाव असलेल्या या मूर्तीकडे ग्राहकांचे लक्ष वेधले जात आहे. विशेषतः जुन्या शहरातील मुर्तीकारांकडे मुखवट्यांसाठी गर्दी झालेली दिसते. चारशे रुपयांपासून ते चार हजार रुपयांपर्यंतचे मुखवटे बाजारपेठेत आहे. अनेक भक्त हे लहान बालकांचे मुखवटे मागतात त्यांच्यासाठी केवळ लहान बाळांचे मुखवटे विक्रीस उपलब्ध आहे.यंदा इको-फ्रेंडली (पर्यावरणपूरक) मूर्तींना अधिक मागणी आहे. शाडू मातीपासून बनवलेल्या मूर्तींना पसंती दिली जात आहे. एका विक्रेत्याने सांगितले, 'आम्ही यंदा अनेक नवीन डिझाइन्स आणल्या आहेत. पारंपरिक मुखवट्यांच्या जोडीला राजस्थानी, कोल्हापुरी आणि इतर प्रादेशिक शैलीतील मुखवटेही उपलब्ध आहेत. गौरी-गणपतीच्या मुखवट्यांची खरेदी करण्यासाठी लोक आपल्या कुटुंबासह येत आहेत. 'ज्यांच्याकडे परंपरागत मुखवटे खंडले त्यांच्याकडे नवीन मुखवटे



घेतात. त्यांच्या मागणीप्रमाणे मुखवटे घडविले जात असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले. गौरी-महालक्ष्मीचा उत्सव हा केवळ मूर्ती आणणे नव्हे, तर कुटुंबातील आनंदाचे आणि एकत्रीकरणाचे प्रतीक आहे. घरात गौरींचे आगमन म्हणजे समृद्धी आणि आनंदाचे स्वागत. यामुळे अनेक कुटुंबियांमध्ये मुखवट्यांची निवड करण्यापासून ते त्यांच्या सजावटीपर्यंत एक विशेष उत्साह दिसून येतो. मुखवट्यांच्या खरेदीसोबतच सजावटीचे साहित्य, दागिने आणि आकर्षक वस्त्रेही मोठ्या प्रमाणात विकली जात आहेत, ज्यामुळे बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.या उत्सवांच्या तयारीमुळे केवळ धार्मिक भावनाच नाही, तर सामाजिक आणि आर्थिक उलाढालीलाही चालना मिळत आहे.

## फलोत्पादन विकास अभियानात आता

# औषधी व सुगंधी वनस्पतीचा समावेश

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात आता औषधी व सुगंधी वनस्पतीचा समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडून अनुदानासाठी अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे.

**औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी अनुदान**

अभियानात अनुदानासाठी शेतकरी ज्येष्ठमध, मुलेठी, शतावरी, कलिहारी, सफेद मुसळी, गुग्गूळ, मंजिष्ठा, कुटकी, अतिस, जटामासी, अश्वगंधा, ब्राम्ही, तुलसी, विदारीकंद, पिंपळी, चिराटा, पुष्करमूळ आदी औषधी वनस्पतींची लागवड करू शकतात. लागवडीचा मापदंड प्रतिहेक्टरी दीड लाख रू. आहे. सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के आणि अधिसूचित क्षेत्रांसाठी ५० टक्के अर्थसाह्य, लागवड साहित्य मिळते. जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान मंजूर होईल.

**महाग सुगंधी वनस्पतीसाठी अनुदानाची तरतूद**

गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाईल, चंदन, दवणा, जाई, लॅव्हेंडर यासारख्या महागड्या सुगंधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी देखील अनुदान उपलब्ध आहे. प्रतिहेक्टरी १ लाख २५ हजार रू. याप्रमाणे मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के, अधिसूचित क्षेत्रांसाठी ५० टक्के अर्थसहाय्य, साहित्य दोन हे. मर्यादेत देय आहे.

**साध्या सुगंधी वनस्पतींसाठी मदत**

पामरोसा, गवती चहा, व्हेटिव्हर, तुळस, जावा सिट्रेनेला, गोड तुळशीपत्र यासारख्या वनस्पतींसाठी लागवड खर्च ५० हजार रू. प्रति हेक्टर गृहित धरून सर्वसाधारण क्षेत्रात ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रात ५० टक्के अर्थसाह्य दोन हे.

मर्यादेत देय आहे. क्षेत्रविस्तारासाठी हा कार्यक्रम राबवला जातो. त्याचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन घटकाखाली अर्ज करावेत. योजनेचा अधिकाधिक शेतक-यांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

# सामूहिक शेततळ्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात सामूहिक शेततळे व वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी अनुदान मिळण्यासाठी इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.सामूहित शेततळ्यांत ५ हजार घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात ३ लक्ष व अधिसूचित क्षेत्रात ३.७५ लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे. ३ हजार ५०० घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात २.१० लक्ष व अधिसूचित क्षेत्रात २.६२ लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे.२ हजार घ.मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात १.२० लक्ष व अधिसूचित क्षेत्रात १.५० लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे. ५०० घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात ३० हजार व अधिसूचित क्षेत्रात ३७ हजार रू. अर्थसाह्य देय आहे.वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ७५ हजार रू. साह्य दिले जाईल. इच्छूकांनी महाडीबीटी पोर्टलवर सीएससी केंद्रामार्फत किंवा वैयक्तिकरीत्या ऑनलाईन नोंद करून योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# अकस्मात ढगफुटी पावसाने घेतला शेतकऱ्याचा बळी!

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात रविवारी झालेल्या अकस्मात ढगफुटी पावसाने थैमान घालून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले. या अचानक आलेल्या पुरामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत, शेती पाण्याखाली गेली असून अनेकांचे पिके वाहून गेली आहेत. यामुळे हताश व नैराश्येत सापडलेल्या एका शेतकऱ्याने आपले जीवन संपवण्याचा मार्ग स्वीकारला आहे.खरीप ढोरे येथील शेतकरी राजेंद्र ज्ञानदेवराव ढोरे (वय ५२) यांनी खरीप हंगामासाठी आपल्या सात एकर सामायिक शेतात सोयाबीन पिकाची लागवड केली होती. मात्र रविवारी झालेल्या ढगफुटी पावसामुळे आलेल्या पुराच्या पाण्याने संपूर्ण पीक वाहून गेले. आर्थिक नुकसान, कर्जाचा वाढता बोजा आणि भविष्यातील उपजीविकेची भीती या सर्वांचा ताण राजेंद्र ढोरे यांना सहन झाला नाही. अखेर आज २५ ऑगस्ट रोजी सकाळी त्यांनी आपल्या



शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या करून जीवन संपवले.ही घटना समजताच परिसरात प्रचंड हळहळ, संताप आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राजेंद्र ढोरे यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे. नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा, उत्पादन खर्चातील वाढ, आणि शासनाकडून होणारी अपुरी मदत यामुळे शेतकऱ्यांची आत्महत्या थांबण्याचे नाव घेत नाही. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.शासनाच्या विविध योजना अस्तित्वात असल्या तरी प्रत्यक्षात त्या गरजू पर्यंत पोहोचत नसल्याची शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. 'दरवर्षी पिके वाहून जातात, सरकार मदतीच्या घोषणा करते; पण मदत केव्हा मिळते याचा पत्ता नाही,' अशा शब्दांत शेतकरी संताप व्यक्त करत आहेत.या घटनेने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या असुरक्षित भविष्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, तातडीने नुकसानग्रस्तांना मदत करण्याची मागणी जोर धरत आहे.

## थोडक्यात

### तिडके वाड्यातील राधाकृष्ण मंदीरातील तान्हा पोळा



**हिवरखेड :** येथील तिडके यांचे ईतीहास कालीन दिवानखान्यातील राधाकृष्ण मंदीरात देवळीवेस परीसरातील लहान बालकाचा तान्हा पोळ्यातिल बैलाचा पोळा भरतो त्यांना घाट लावुन डफडड्याच्या चालीवर लहान पोळा हा आज दिनांक२३/८/२५ ला सकाळी मारोती धूरदेव च्या डफफळ्याने वाजतगाजत गेल्या चाळीस अडोतीस वर्षापासून बाळासाहेब नेरकर च्या सहयोगाने मिरवनूक निघुन शंकर सस्थान, काटकर मंदीर चंडीका चौक भवानी मंदीर पुरातन महादेव मदीर, विठ्ठल मंदीर, फत्तेपुरी सस्थान, वरून राधाकृष्ण मदिर वर येतो तीथे तोरन बांधलेले असते तिथे खाऊचे व नारळ लावलेले तोरण मूले तोडतात तर तिडके परीवारातील कैलास तिडके यांचे कडुन आरती होते त्यानंतर सर्व सजवीलेल्या बैलाना लाईनमधे ठेवून ऊत्कृष्ट बैल सजावट मधुन प्रथम क्रमाकांचे पारीतोषीक मंदींराला आषु सूरळकर द्वितीय क्रमाक ऊत्कर्ष नेरकर याचे अमरनाथ दर्शन ला मिळाले तीसरे बक्षिस लाडकी बहीन, या देखावा दिव परनाटे याला मिळाले तर आपरेशन शिंदूर चे चवथे बक्षीस बंटी शेळके यास देन्यात आले यावेळी रमेश दुंतोडे बाळासाहेब नेरकर अमोल पिसोळे गजानन भटकर मनोहर भटकर आषुतोश तिडके राहूल डावखे मयुर डालके नंदु वाकोडे रामकृष्ण रायबोले या मान्यवराकडुन बक्षिस वितरण करन्यात आले तसेच या बाल पोळ्यात हजर राहलेले सर्व तान्हा पोळ्यातील बालकाना खाऊ व वैयक्तीक रोख बक्षीसे डॉ तिडके कैलास तिडके कृष्णा तिडके गजानन तिडके ऊमेश तिडके याचे हस्ते प्रमानपत्र व रोख प्रदान करन्यात आले.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ

## स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यास मंगळवारपर्यंत मुदतवाढ

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** राज्य शासनाच्यावतीने या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्य उत्सवः म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' च्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील अधिकाधिक मंडळांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.अधिकाधिक मंडळांना सहभागी होता यावे, यासाठी आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. २६ ऑगस्ट २०२५ असेल.या स्पर्धेचे अर्ज https:// ganeshotsav.ldmka.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जाणार आहेत. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभागी होऊन तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पारितोषिके जिंकण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# दिव्यांगांच्या सुरातून दृष्टी गणेशा अवयव दानाची विशेष जनजागृती मोहीम



**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध जनजागृतीपर कार्यक्रम निरंतर केले जात आहेत . त्याचाच एक भाग म्हणजे दि.२७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२५ पर्यंत होणाऱ्या सार्वजनिक गणेश उत्सवासाठी संगीतमय दृष्टी गणेशा कार्यक्रम दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे आयोजित केला आहे . सदर कार्यक्रम संस्था गेल्या १२ वर्षापासून करीत असून या संगीतमय कार्यक्रमात दिव्यांग कलावंत आपली कला प्रस्तुत करतात . या कार्यक्रमात मराठी हिंदी भक्ती गीते , गणेश वंदना , आरती व अवयवदानावरील जनजागृती पर गीतांचा समावेश केला जातो . संस्थेतर्फे अकोला जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात या कार्यक्रमाची प्रस्तुती केली जाते या कार्यक्रमात रक्तदान , नेत्रदान , निसर्ग संवर्धन , प्लास्टिक बंदी , स्त्री शिक्षण , दिव्यांगांच्या समस्या इत्यादी विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम केले जातात . दिव्यांगांच्या कला प्रस्तुती बरोबरच अकोल्यातील नेत्रतज्ञ डॉ.नितीन उपाध्ये , दंतचिकित्सक डॉ. विद्या जयसवाल उपस्थित होते.

# कीर्ती नगरच्या रामदेवबाबा जागरणास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकोलाः** लाखो भक्तांचे तारणहार रामसापीर रामदेवबाबा यांचा पावन जन्मोत्सव स्थानिक कीर्ती नगर, बाजोरिया लेआउटमधील रामसा परिसरात यजमान टेकडीवाल परिवार व रामदेवबाबा भक्तांनी मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला.यजमान टेकडीवाल परिवाराच्या वतीने सन १९७९ पासून सातत्याने रामदेव बाबांच्या जन्मोत्सव निमित्त अनेक जुम्मा जागरण आणि कथा वाचन आयोजित केले जात आहेत. या उत्सवात जुम्मा जागरणकार नरेश जोशी अंबाडावले यांनी त्यांच्या संगीत चमू सह रामदेव बाबांच्या जीवनावर आधारित संगीतमय जुम्मा जागरण सादर केले. भाविकांनी नृत्य आणि भक्तीपूजेने उत्सव साजरा केला. यावेळी भजन गायक नरेश जोशी यांनी कलियुगातील महान अवतारी रामदेव बाबांचे संपूर्ण जीवन अवतार कार्य त्यांच्या जागरणात सादर करून भक्तीमय वातावरण निर्माण केले.

# मान्य केलेल्या प्रलंबित मागण्या सोडवा

## एसटी कामगार संघटना च्या पदाधिकाऱ्यांनी सुरु केले आमरण उपोषण

**■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :** राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला विभाग नियंत्रक कार्यालयात पत्र क.राप/ विनि / काम/२६५४ दि. १३/ऑगस्ट /२५ ला एसटी कामगार संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी एस टी च्या कामगारांवर होत असलेल्या अन्यायाबाबत पत्र दिले होते. त्यानंतर . १८/८/२०२५ रोजी विभाग नियंत्रक रा.प.अकोला यांच्या दालनात चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चे दरम्यान सर्व मुद्यांवर सविस्तर चर्चा करून उभयपक्षी तोडगा मान्य करण्यात आला होत. त्यामूळे प्रशासनाने दाखविलेल्या सकारात्मकतेचा विचार करून २०/ऑगस्ट /२०२५ रोजीचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगीत करण्याचे एस टी प्रशासनाला कळिवले होते. त्यामध्ये उभयपक्षी मान्य केलेल्या तोडम्याप्रमाणे दि. २३/ऑगस्ट /२०२५ पर्यत निर्णयात्मक स्वरूपात सोडवणुक होणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने उभयपक्षी मान्य केल्या प्रमाणे दिनांक२३/८/२०२५ रोजीच्या मुद्द्याची सोडवणुक केलेली नसल्यामुळे एसटी कामगार संघटना च्या ६ पदाधिकाऱ्यांनी आजपासून विभागीय नियंत्रक कार्यालयासमोर आमरण उपोषण



सुरु केले आहे.

अकोला विभाग नियंत्रक कार्यालयात बिंदू नामावली प्रमाणित केल्यानुसार कामगारांना तात्काळ पदोन्नती, भरती, आणि नियुक्ती प्रक्रिया सुरु करा. या प्रमुख मागणी सह इतर मागण्या सोडविष्याकरीता कामगारांच्या न्याय हक्कासाठी आज दिनांक,२५/८/२०२५ पासुन विभागीय कार्यालय मंगरूळपीर रोड कौलखेड अकोला सामोर विभागीय कार्याध्यक्ष पवन शिंदे, कारंजा डेपो सचिव इंद्रसिंग राठोड, अकोला आगार क्र. २ चे संघटना अध्यक्ष विनय बोदडे, रामेश्वर मुसळे सुरज राठोड, विजय गवई ह्या ६ पदाधिकाऱ्यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. कामगारांच्या समस्या सोडवीण्यासाठी विभागीय अध्यक्ष गणेश डांगे, विलास डुबुले सविता नागवंशी, माजी विभागीय अध्यक्ष कैलास नांदूर कर, रुपम वाघमारे सह एसटी कामगार संघटना पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न चालविले आहेत.

# पातूर येथे बैलपोळ्यानिमित्त उत्कृष्ट बैलजोडी सजावट स्पर्धा उत्साहात



**■पातुर,दि २५ (प्रतिनिधी) :** शेतकऱ्यांचा सन्मान आणि त्यांच्या मेहनतीचे प्रतीक असलेल्या बैलजोडींचा पारंपरिक बैलपोळा सण पातूर शहरात शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील बाळापुर वेस व खानापूर वेस, गोंडवेस परिसरात पोळ्याचा मोठा उत्सव साजरा झाला.यावेळी श्री खडकेश्वर महाराज संस्थान परिसरात उत्कृष्ट बैलजोडी सजावट स्पर्धा घेण्यात आली. शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोडींना विविध पारंपरिक व आकर्षक सजावटीने सजवून सणाचा गाभा अधिक खुलविला. स्पर्धेत अनेक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला व आपापल्या बैलजोडींच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविले.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत गजानन तायडे शेतकऱ्याच्या बैलजोडीने प्रथम पारितोषिकाचा मान पटकावला, तर मंगेश फुलारी शेतकऱ्याच्या बैलजोडीला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पारितोषिक वितरण समारंभात पातूरचे सहाय्यक ठाणेदार गजानन तडसे यांच्या हस्ते शेतकऱ्यांना सन्मानचिन्हे व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम स्पर्धेचे निरीक्षक अनिल दाते , प्रा. विजय अत्तरकर, देवानंद गहिले, गणेश निमकंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गणेशोत्सव : राज्य महोत्सव

यंदा राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा दिल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक गडद होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे. या विषयीच्या विविध निर्णयांची माहिती देणारा हा लेख.

-------------

महाराष्ट्रामध्ये गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, जिथे तो एक सार्वजनिक उत्सव बनला आहे. १९ व्या शतकात, लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला एक सार्वजनिक सण म्हणून सुरू केले, ज्यामुळे तो अधिक लोकप्रिय झाला. विशेषतः मुंबई - पुण्याचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. जगात आणि देशात आपल्या गणेशोत्सवाची ओळख सर्वात मोठा महोत्सव म्हणून झालेली आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. महाराष्ट्र शासनाने यंदा गणेशोत्सवाला ह्यराज्य महोत्सवह्न म्हणून घोषित केल्याने विशेष आनंद आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते.

आता गणेशोत्सव प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा हा मुख्य उद्देश आहे. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सर्व राज्य आणि केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता २२ देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे ठेवली गेली असून समाज माध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जात आहे.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करणे. राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुमारे १.५० कोटी रुपये इतक्या रकमेची पारितोषिके वितरित करण्यात येणार आहेत

गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्कोचा दर्जा मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे.

त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या काळात आपापल्या विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात यावा. तसेच आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना यांचा गौरव करण्यात यावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

गणेशोत्सवाला ह्रराज्य महोत्सवह्न दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक घट्ट होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे.

वर्षानुवर्षाची परंपरा असलेला गणेशोत्सव यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास शासनाची यंत्रणा सज्ज झाली असून गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेश आरास स्पर्धा, चौकाचौकात रोषनाई, ड्रोन शो, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे जल्लोषात



गणेशोत्सव साजरा होणार आहे.

**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.**

शासन निर्णयानुसार तालुका स्तरापासून राज्य स्तरावर विविध गणेशोत्सव मंडळ जे धार्मिक प्रथा परंपरानुसार सहभागाने पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमात काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकाची घोषणा केली आहे. तसेच गिरगाव चौपाटीवर ड्रोन महोत्सव आयोजन करण्यात येणार असून पुणे, नाशिक, नागपूर, मुंबई आणि राज्यातील सर्व भागात स्थानिक स्तरावर शक्य असेल त्या सार्वजनिक ठिकाणी रोषणाई करण्यात येणार असून गणेशोत्सव काळामध्ये भजनी मंडळांना भजनामधील साहित्यासाठी थेट लाखो रुपयांचे अनुदान देण्याची योजना घोषित झाली आहे. परदेशातही गणरायाचे आगमन धुमधडाक्यात व्हावे, म्हणून हा राज्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, ही भूमिका घेण्यात आली आहे.

या महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. या स्पधचे अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्य पोर्टल द्वारे ऑनलाइन स्वरूपात स्वीकारले जात आहेत.

ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे

यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे.

आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरीता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे पोर्टल द्वारे प्रसिद्ध करावीत व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता येईल याची व्यवस्था करावी.

हा गणेशोत्सव- राज्य महोत्सवाचा शासन निर्णय गणरायाच्या चरणी घोषित करताना आनंद होत असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. याबाबत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा आणि विविध कार्यक्रम यांचे दोन स्वतंत्र सविस्तर शासन निर्णयही जारी करण्यात आले आहेत. पु. ल. देशपांडे कला अकादमी आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे या महोत्सवाचे नियोजन व समन्वय करण्यात येत आहे.

गणेशोत्सवात यंदा शासनाचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून शासकीय आस्थापनाच्या इमारती, वारसास्थळांवर या बोधचिन्हाची रोषणाई करण्यासोबत महत्त्वाच्या चौकाचे सुशोभीकरण करुन रोषणाई करावी. संपूर्ण राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राची कला व संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमांतून घडेल. हे कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेर ज्या ठिकाणी मराठी बांधव मोठ्या प्रमाणात आहेत त्या ठिकाणीही करण्यात येत आहेत. तसेच मराठी भाषिक बहुल भारताबाहेरील काही देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

काही ठिकाणी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन करण्यात येत आहे. ज्या चित्रपटांमधून गणपती विषयक परंपरा, कला संस्कृती दर्शवलेली आहे, अशा चित्रपटांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवावर आधारित टपाल तिकीट आणि नाणे काढण्यात येईल. संपूर्ण राज्यभरातून गणपतीविषयक रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ह्यड्रोन शोह्न चे आयोजन करण्यात आले आहे. या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी यासाठी वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ आणि समाज माध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रम, उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. उत्सवाच्या दरम्यान प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करण्यात येणार आहे. पारंपरिक भजन व आरती सादर करणाऱ्या भजनी मंडळांना साहित्य वाटप, अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. विसर्जन सोहळ्यामध्ये आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विविध सोयी-सुविधा व वाहन व्यवस्था उपलब्ध करण्यात येणार आहे. राज्यात शिकत असणाऱ्या देशाबाहेरील विद्यार्थ्यांना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी योजना, उपक्रम राबविण्यात येत आहे.




## महाराष्ट्राचा राज्य उत्सव

यंदाच्या गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली असून याबाबत प्रशासनाने गणेश मंडळ, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला आहे.

प्रसिद्ध गणेश मंडळे, गणेश मंदिरांनी भक्तांकरिता थेट प्रक्षेपणाद्वारे घरातूनच दर्शनाची सोय उपलब्ध करुन द्यावी, केंद्रीय राज्य राखीव पोलीस दलाचा बँड शो आणि पोलीस दलांचा बँड शो तसेच डॉग शोचे आयोजन करावे. शाळा, महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनांचे विद्यार्थी, सामाजिक संस्थांना सहभागी करुन उपक्रमाचे आयोजन करावे.

महावितरणने गणेश मंडळांना वीज उपलब्ध करुन द्यावी. आरती करणाऱ्या भजनी मंडळाना मोफत साहित्य वाटप करण्यात यावे. विसर्जन मार्गावर ड्रोन शोचे आयोजन, जाहिरात फलकांवर सामाजिक संदेश देण्याची कार्यवाही करावी. विदेशी विद्यार्थी, नागरिक, विदेश दुतावासातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे. भारतीय हवामान विभागाकडून पावसाबाबत देण्यात येणाऱ्या अंदाजानुसार प्रशासनाने तयारी करावी.

गणेशोत्सवानिमित्त सर्वांचा सन्मान झाला पाहिजे, अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाजघटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणावे. विविध सांस्कृतिक विषयांचे जतन व संवर्धन करण्याबाबत तालुका आणि जिल्हास्तरावर विविध स्पर्धा आयोजित कराव्यात.

मराठी संस्कृती, कलाकार, परंपरांना प्रोत्साहन देण्याकरीता मराठी नाट्यमहोत्सव आयोजित करण्यात यावा. विविध विषयांबाबत व्याख्यानमाला, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करावे. समाजमाध्यमाद्वारे व्यापक स्वरुपात प्रसार आणि प्रचार करावा. गणेश मंडळांनी ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी.

यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करुन त्यांच्या कर्तृत्वावर आधारित माहिती फलक लावावेत. मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा. यंदाचा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून सर्वांच्या स्मरणात राहील असाच साजरा करावा हीच गणेशभक्तांकडून अपेक्षा.

---

# भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे.

सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही.

भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला. अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले.

मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली.

आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पदार्पाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली.

विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे.

रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली.

आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते. अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती. आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात.

अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे.

ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की .



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

---

# तिकिटांचा काळाबाजार त्यात कोकणकरांचे हाल!

शिमगा आणि गणपती हे कोकणातील पारंपारिक उत्सव. गेल्या काही वर्षांत कोकणपट्टीत राहणाऱ्या जवळपास प्रत्येक घरातील किमान एक माणूस नोकरी व्यवसायासाठी मुंबई ठाण्यात येऊन राहिला आहे. त्याच्यातील काहींची तिसरी तर काहींची चौथी पिढी आज या शहरांत राहत आहे, शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करत आहे. असे असले तरी या सर्वांची नाळ अजूनही कोकणातील आपल्या गावाशी, घराशी आणि कुटुंबाशी घट्ट जोडलेली असल्याने दोन सणांच्या निमित्ताने जवळपास प्रत्येक कोकणकर आपल्या गावी जायला निघतो.

गणपती अगदी तोंडावर आल्याने आत्ता गणपतीत गावी जाण्याची सिद्धता या सर्वांची सुरु झाली आहे, कार्यालयातून सुट्टी घेणे. गणपतीच्या सजावटीचे साहित्य खरेदी करणे, कुटुंबासाठी नवीन कपडे खरेदी करणे आदींसोबत गावी जाण्यासाठी तिकीट मिळवण्याची धडपडही सुरु झाली आहे. कोकणात रेल्वे सुरु झाल्यापासून कोकणकरांची मोठी सोय झाली आहे त्यामुळे कोकणकर पहिले प्राधान्य रेल्वेला देतात. कोकणकरांच्या सोयीसाठी कोकण रेल्वे प्रशासन या दोन सणांच्या निमित्ताने दरवर्षी जादा गाड्या सोडते, यंदाही प्रशासनाच्या वतीने जादा रेल्वे आणि एस टी बसेस सोडण्यात येणार आहेत. मात्र दरवर्षी या सर्व रेल्वेगाड्या फुल्ल झालेल्या पाहायला मिळतात. ऑनलाईन तिकीट बुक करणाऱ्यांनाही हाच अनुभव येतो. तात्काळ बुकींगच्या बाबतीतही हा अनुभव आज अनेकांनी घेतला आहे. त्यामुळे या बुकिंग जातात कुठे हा यक्षप्रश्न यानिमित्ताने प्रत्येकालाच पडतो.

मग सुरु होते तिकीट मिळवण्यासाठीची धडपड. कोणाच्या ओळखीने तिकीट मिळते का? बुकिंग एजंटकडे तिकीट मिळते का याचा शोध घेतला जातो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तासनतास रांगेत उभे राहूनही तिकीट मिळत नाही मात्र या एजंट मंडळींना अधिकचे पैसे देऊन सहज तिकीट मिळते. मग या एजंट मंडळींकडे तिकीट येते तरी कुठून ?

अर्थातच यामागे मोठा भ्रष्टाचार लपला असून रेल्वेतील अधिकारी मंडळींपासून तिकीट बुक करणारे कर्मचारीही या साखळीत सहभागी झालेले असतात. ऑनलाईन तिकीट बुकींगच्या बाबतीत केला जाणारा मोठा स्कॅम आयआरटीसीने शोधून काढला आहे. जानेवारी ते मे २०२५ दरम्यान आयआरसीटीसीने तब्बल २.९ लाख अशी तिकीट बुकिंग्स शोधून काढली आहेत. तिकिट बुकिंग सुरु झाल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांमध्ये तिकीटे बूक केली जातात; मात्र ही सर्व तिकीटे एजंट मंडळींकडून केली जात असल्याचे उघड झाले आहे. ही तिकीटे ज्या खात्यांवरुन खरेदी केली जातात ती खाती खोटी माहिती देऊन आणि ऑटोमॅटिक तंत्रज्ञान वापरुन हाताळली जातात. ज्यामुळे वेळातच या खात्यांवरुन तिकीटे बुक केली जातात आणि सर्वसामान्यांच्या हाती लागते ती केवळ निराशा.

उत्सवाच्या काळात आणि सुट्ट्यांच्या काळात तिकीटांचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात होतो. जेव्हापासून कोकण रेल्वे सुरु झाली आहे तेव्हापासून दरवर्षी हा त्रास कोकणकरांना सहन करावा लागत आहे. यावर उपाय काढणार तरी कोण?



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

---

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### अवयव दान

**मृत्यु होता व्यक्तिचा**
**केला जातो**
**अग्नीदहन संस्कार**
**शेवटी काय तर**
**शरीराची**
**राखच होणार ..!**

**त्यापेक्षा मरावे परी**
**किर्ती रुपे उरावे**
**अवयव दान करुन**
**गरजवंतांना**
**जीवदान द्यावे..!**

---

### हरितालिका : अखंड सौभाग्याचे व्रत!

**वाचक लिहितात**

भाद्रपद शुद्ध तृतीयेला हरितालिका व्रत केले जाते. माता पार्वतीने भगवान शिवाची वर प्राप्ती व्हावी म्हणून हे व्रत केले होते. आणि या व्रतामुळेच त्यांना भगवान शिव पति रूपाने मिळाले. त्यामुळे मनासारखा वर मिळावा यासाठी कुमारिका आणि अखंड सौभाग्य लाभावे यासाठी विवाहित स्त्रिया हे व्रत करतात.

या व्रतात भगवान शिव-पार्वती यांचे प्रतीक म्हणून शिवपिंडीची पार्वतीसह स्थापना करून त्याची पूजा केली जाते. पूजनाच्या वेळी सोळा प्रकारची पत्री, बेल, फुलं , धोत्र्याचे फळ शिवपिंडीवर वहातात. पूजेच्या वेळी प्रज्वलित केलेला दिवा विसर्जनापर्यंत, म्हणजे दुसऱ्या दिवसापर्यंत अखंड तेवत ठेवला जातो. स्त्रिया रात्रभर जागरण करून स्तोत्र, भजन, भगवान शिवाचे नामस्मरण करतात. हरतालिका व्रताची कथा वाचतात. जीवनातील विघ्ने दूर व्हावीत आणि अखंड सौभाग्य लाभावे, यासाठी भगवान शिवाला प्रार्थना केली जाते. या व्रतात निर्जळ उपवास करणे याला विशेष महत्त्व आहे. या व्रताच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मबल वाढते आणि आयुष्य अधिक मंगलमय होते. या पवित्र हरितालिका व्रताच्या निमित्ताने सर्व स्त्रियांना मंगलमय जीवन आणि भगवान शिव-पार्वतींचे आशीर्वाद लाभोत, हीच प्रार्थना!

**सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

---

# दह्यात मीठ घालावं की साखर?



दही म्हटलं की अनेकांच्या आवडीचा पदार्थ. जेवणातला आणि आरोग्याच्या बाबतला सर्वाच महत्त्वाचा भाग.

अनेकांना तर रोजच्या जेवणात दही हे लागतच. मुख्य म्हणजे दही जेवणाची चव वाढवतं आणि दुसरं म्हणजे आणि पचन सुधारतं. अनेकजण दह्यात काही मिसळून खाण्याऐवजी असचं दही खातात, तर काहीजण दह्यात साखर किंवा मीठ मिसळून खातात. पण नक्की प्रश्न असा आहे की दह्यात मीठ घालावं की साखरं? कोणतं सर्वात जास्त फायदेशीर असतं? जाणून घेऊयात.

**दही खाण्याची योग्य पद्धत नक्की कोणती?**

काही लोक दह्यात साखर घालून खातात, तर काही लोक चव वाढवण्यासाठी मीठ आणि कधीकधी जिरे पावडर किंवा सॅलडमध्ये दही घालून ते खातात. काही गावांमध्ये तर लोक वर्षभर मीठ घालून दही खाणे पसंत करतात, पण ही सवय आरोग्यासाठी चांगली आहे का? दही खाण्याची योग्य पद्धत नक्की कोणती आहे ते जाणून घेऊया.

**साखरेसोबत दही खावे की मीठ खावे?**

आहारतज्ज्ञांच्या मते साखरेसोबत दही खाणे अधिक फायदेशीर आहे. त्याचबरोबर, गुळासोबत दही खाणे हा देखील एक आरोग्यदायी पर्याय मानला जाऊ शकतो. दुसरीकडे, मीठ घालून दही खाणे टाळावे. जर तुम्हाला ते खायचेच असेल तर जेवताना चवीनुसार थोडे काळे मीठ किंवा खडा मीठ घालावं.

असं दही खाल्लं तर आरोग्याला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, दह्यात मीठ घालून ते जास्त काळ ठेवल्याने त्यात असलेल्या लॅक्टोबॅसिलस बॅक्टेरियाच्या पेशींवर वाईट परिणाम होतो, ज्यामुळे दह्याचे पोषक तत्वे कमी होतात. तसेच आरोग्याला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते.

दुसरीकडे, संधिवात, दमा, सांधेदुखी, मूत्रपिंड आणि सर्दी असलेल्या रुग्णांनी तर दही खाऊच नये. पावसाळ्यात पचनसंस्था कमकुवत होते, म्हणून दही खाणे टाळावं किंवा ते मर्यादित प्रमाणात मर्यादित खावं.

**दही खाण्याची उत्तम वेळ**

तसेच, दही खाण्याची उत्तम वेळ म्हणजे दुपारच्या जेवणात. रात्री कधीही दही खाऊ नये. कारण रात्री दही खाल्ल्याने गॅस, पोटफुगी आणि जडपणा येऊ शकतो. योग्य वेळी, योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात दही खाल्ले शरीरासाठी फायदेशीर असते. आणि जरी रात्रीच्या जेवणात दही खायचेच असेल तर ते नुसतेच खाण्यापेक्षा सॅलेडमध्ये थोडेसे घालून खाऊ शकता.

# महाराष्ट्रात पीएम कुसुम योजनेअंतर्गत सीआरआय पंप्सना १०,७१४ सोलर पंपिंग सिस्टमसाठी रुपये ३२० कोटींची ऑर्डर मिळाली

**नागपूर, २५ ऑगस्ट :** सीआरआय पंप्सचा एक विभाग आणि अक्षय ऊर्जा-चालित जल उपायांमध्ये अग्रणी असलेल्या सीआरआय सोलरला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) कडून मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत रुपये ३२० कोटी किंमतीच्या ३ एचपी, ५ एचपी आणि ७.५ एचपी क्षमतेच्या १०,७१४ ऑफ-ग्रिड डीसी सोलर फोटोव्होल्टेइक वॉटर पंपिंग सिस्टम्स (एसपीडब्ल्यूपीएस) चे डिझाइन, पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करण्यासाठी लेटर ऑफ एम्पॅनेलमेंट (एलओई) प्रदान करण्यात आले आहे. एसपीडब्ल्यूपीएसमध्ये इनबिल्ट आयओटी-सक्षम रिमोट मॉनिटरिंग सिस्टम (आरएमएस) आहे आणि तिला दुरुस्ती आणि देखभालीसाठी ५ वर्षांची वॉरंटी आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पाण्याची कमी उपलब्धता असलेल्या आणि ग्रिड नसलेल्या भागात विश्वासार्ह पाणी उपलब्धता सुनिश्चित होण्यास मदत होईल, पारंपारिक ऊर्जेवरील अवलंबित्व मोठ्या कमी होईल, सिंचनाच्या विश्वासार्हतेत सुधारणा होईल आणि कृषी उत्पादकता आणि ग्रामीण समृद्धी वाढेल.



प्रकल्पाची अंमलबजावणी महावितरणच्या निर्धारित वेळेनुसार सुरू होईल, सीआरआय सोलर वेळेवर, कार्यक्षम आणि उच्च दर्जाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सौर उपयोजनांमध्ये सिद्ध झालेल्या कौशल्याचा वापर करेल.

या महत्त्वाच्या टप्प्यावर भाष्य करताना, सीआरआयचे अध्यक्ष जी. सौंदर्यराजन म्हणाले, महावितरण विभागाकडून ३२० कोटीचे हे पॅनेलमेंट केवळ व्यावसायिक यशापेक्षा बरेच काही जास्त आहे - हे स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत जल उपायांसह भारतातील शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या दिशेने एक ध्येय-चालित पाऊल आहे. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी विश्वासार्ह सिंचन पोहोचवण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी आम्हाला महाराष्ट्रासोबत सहयोग करण्याचा अभिमान आहे.

सीआरआयने भारताच्या ऊर्जा-कार्यक्षम आणि शाश्वत जल पायाभूत सुविधांकडील संक्रमणाला चालना देणे सुरू ठेवले आहे आणि त्यांनी देशभरात १,८१,००० हून अधिक सौर पंपिंग प्रणाली कार्यान्वित केल्या आहेत, ज्यांना आयओटी-सक्षम स्मार्ट मॉनिटरिंग सोल्यूशन्सद्वारे साहाय्य प्राप्त आहे. या प्रकल्पांमुळे ६,१०० दशलक्ष किलोवॅट तासाहून अधिक ऊर्जेची बचत झाली आहे आणि ४.८ दशलक्ष टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन रोखले आहे, जे पर्यावरणीय व्यवस्थापन, राष्ट्रीय प्रगती आणि ग्रामीण उन्नतीसाठी सीआरआयची वचनबद्धता दर्शवते.

उच्च-कार्यक्षमता असलेल्या सौर पंपिंग सिस्टीम, बुद्धिमान रिमोट मॉनिटरिंग आणि व्यापक विक्री-पश्चात समर्थनासह, सीआरआय सोलर, सरकारच्या नेतृत्वाखालील अक्षय ऊर्जा आणि सिंचन उपक्रमांसाठी एक विश्वासार्ह भागीदार आहेत, जो शेतकरी आणि ग्रामीण समुदायांना विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक जल उपाय प्रदान करतो.

# रेनॉल्टने नवीन किगर लाँच केले: परफॉर्मन्सची पुनर्व्याख्या करणारे धाडसी पाऊल



**नवी दिल्ली, २५ ऑगस्ट :** फ्रेंच कार निर्माता रेनॉल्ट ग्रुपची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या रेनॉल्ट इंडियाने आज रीथिंक परफॉर्मन्स तत्वज्ञानाअंतर्गत तयार केलेल्या न्यू किगरची घोषणा केली. १०० पीएस टर्बोचार्ज्ड इंजिन आणि ३५ हून अधिक सुधारणा असलेल्या या ही सब-फोर मीटर एसयूव्हीमध्ये कामगिरी, उत्तम इंधन कार्यक्षमता आणि अपवादात्मक मूल्याचे उत्तम संयोजन आहे.

अधिक उत्तम कामगिरी करण्यासाठी सक्षम डिझाइन, स्मार्ट तंत्रज्ञान आणि वाढीव सुरक्षा एकत्रीकरणासह या किगरचे नूतनीकरण केले आहे आणि ते विचारपूर्वक निवडलेल्या ट्रिम्सच्या श्रेणीमध्ये उपलब्ध आहे. पूर्णपणे लोड केलेले टर्बो किगरचे दोन प्रकार आहेत - टेक्नो आणि इमोशन. यांची किंमत ९.९९ लाख ते ११.२९ लाख (एक्स-शोरूम) दरम्यान आहे. अधिक सोपे, नैसर्गिकरित्या एस्पिरेटेड इंजिन असलेली गाडी ६.२९ लाख ते ९.१४ लाख (एक्स-शोरूम) दरम्यान उपलब्ध आहेत.

या प्रसंगी वेंकटराम ममिलापल्ले, एमडी आणि सीईओ, रेनॉल्ट इंडिया, म्हणाले, नवीन किगर सुरू करण्यास आम्ही उत्सुक आहोत. गाड्यांची ही श्रेणी सर्वात वेगाने वाढते आहे. एसयूव्ही विक्रीमध्ये ५०% आणि देशातील टीआयव्हीमध्ये ३१% असे याचे योगदान आहे. किगर हे या श्रेणीतील एक अनोखे उत्पादन आहे, आणि या नवीन उत्पादनासह आम्ही भारतीय ग्राहकांसाठी अभिव्यक्तिपूर्ण डिझाइन, आणि प्रत्यक्षातील कार्यक्षमता उपलब्ध करून आम्ही आमचे वचन पूर्ण करत आहोत. हे रेनॉल्टच्या भारतकेंद्री परिवर्तन प्रवासातील एक महत्त्वाचा क्षण आहे.

हाताळणीसाठी सोप्या असलेल्या या डिझाइनवर आधारित ब्रँड रेनॉल्टने 'एक्स्प्रेस' या भावनात्मक स्तंभावर आधारित नवीन किगरची उभारणी केली आहे. .

रेनॉल्ट किगरने त्याचे सौंदर्यात्मक डिझाइन, आधुनिक तपशील आणि हलक्या वजनाच्या सीएमएफए+ प्लॅटफॉर्म बोल्ड स्टॅन्ससह कॉम्पॅक्ट एसयूव्ही सेगमेंटमधील अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. नवीन किगर अत्यंत चपळ आणि प्रतिसाद देणारी आहे, ज्यामुळे ग्राहकांना शहरातील रस्ते आणि महामार्गावरील दररोजच्या ड्रायव्हिंगने विश्वास मिळतो. परिपूर्ण कामगिरीसाठी आवश्यक सर्व गोष्टी पूर्ण होतात, असे रेनॉल्ट इंडियाचे विक्री आणि विपणन उपाध्यक्ष फ्रान्सिस्को हिडाल्गो म्हणाले.

# पूर्ती सुपर बझारची २६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न

**नागपूर, २५ ऑगस्ट :** सेंट्रल इंडीया मध्यवर्ती बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्यादीत. नागपूरव्दारे संचालीत पूर्ती सुपर बझारची २६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा नुकतीच लक्ष्मीनगरातील सायंटिफिक सभागृहात पार पडली.

या सभेत मागील अहवाल वर्षातील दिवंगत भागधारक तसेच इतर ज्ञात, अज्ञात व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यात स्व. विजय रूपानी, मारुती चितमपल्ली, स्व. रतन टाटा यांचा समावेश होता. सुरवातीला श्रीमती निलीमा गढीकर यांनी मागील वर्षीच्या इतिवृत्ताचे वाचन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर यांनी गेल्या आर्थिक वर्षातील विविध स्तरावरील संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. पूर्ती सुपर बझार च्या रौप्य महोत्सवी वर्षात पूर्तीने लक्ष्मीनगर व मनीष नगर शाखेत अनेक विविध सेक्शन सुरू केले यात मनीष नगर येथे लहान मुले, महिला व पुरूषांसाठी रेडिमेड गारमेन्टस्चा सेक्शन तसेच दोनही शाखेत खेळणी व क्रॉकरीचे सेक्शन सुरू करण्यात आले. या सेक्शन्सला ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे असे रविंद्र बोरटकर यांनी सांगीतले. राष्ट्रीय स्तरावर सेवा देणारे मोठे सुपर मार्केट पूर्तीच्या दोनही शाखांजवळ उघडले तरीही पूर्तीने आपली विक्री वाढविली कारण ग्राहकांचा पूर्ती वरील विश्वास, उत्तम क्वॉलिटीच्या वस्तू देण्याची पूर्तीची परंपरा व उत्तम सेवा देणारा स्टाफ हे आहेत असेही ते म्हणाले. सर्व स्पर्धेवर मात करत पूर्तीने जयंती नगरी ७ बेसा रोड येथे मागील आर्थिक वर्षात नवीन शाखा सुरु केली व तेथे चांगला प्रतिसाद मिळत आहे असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थीत असलेल्या सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. सभेमधे भागधारकांसाठी १० टक्के प्रोत्साहन राशी देण्याचेही त्यांनी जाहीर केले.

संस्थेच्या भविष्यातील विस्ताराच्या विविध संकल्पना व योजना रविंद्र बोरटकर यांनी सविस्तरपणे मांडल्या संस्थेच्या विस्तार वाढीच्या दृष्टीने या आर्थिक वर्षात पूर्ती सूपर बझारच्या नवीन शाखा सुरू होणार आहे असे अध्यक्ष रविंद्र बोरटकर यांनी सांगीतले. या आर्थिक वर्षात वर्धा, गडचिरोली, सावनेर व कळमेश्वर येथे पूर्तीच्या नवीन शाखा सुरु करण्याचा मानस आहे. यापैकी सप्टेंबर महिन्यात वर्धा येथे पूर्तीची नवीन शाखा सुरु होणार आहे अशी माहिती त्यांनी दिली. पूर्तीच्या विस्तारीकरणाला लागणाऱ्या आर्थिक पाठबळा करीता संचालक मंडळ प्रयत्न करीत आहे, संचालक मंडळाने ३ कोटींचे भागभांडवल उभे करण्याचे लक्ष्य ठेवले असून ते प्रयत्नरत आहे असेही ते म्हणाले.

# एक्सक्लुझिव्ह बिझनेस चेंबर द इम्पेरियलचे अदाणी शांतिग्राममधील बेल्वेडियर गोल्फ अँड कंट्री क्लबमध्ये उद्घाटन

**अहमदाबाद, २५ ऑगस्ट :** गुजरातला आता उद्योग आणि संस्कृतीसाठी एक नवे ठिकाण मिळाले आहे द इम्पीरियल हे भव्य बिझनेस चेंबर, ज्याचे उद्घाटन अदाणी शांतिग्राममधील बेल्वेडियर गोल्फ अँड कंट्री क्लबमध्ये झाले. केवळ आमंत्रणावर आधारित हे खास चेंबर असून, प्रतिष्ठित व्यावसायिक व्यक्तींसाठी तयार केले गेले आहे. येथे १० वर्षांचे सभासदत्व दिले जाते ज्यामध्ये प्रायव्हेट लाउंज, आधुनिक कॉन्फरन्सिंग सुविधा, आलिशान राहण्याची सोय, स्पा सेवा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय मंचांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते.



द इम्पेरियल हे गुजरातमधील पहिले असे ठिकाण आहे, जिथे परंपरेवर आधारित वास्तुकलेचा स्पर्श आणि आधुनिक व्यावसायिक उपक्रमांसाठीच्या जागा यांचा सुंदर संगम आहे. हे फक्त एक ठिकाण नसून, असे केंद्र आहे जिथे विचारवंत नेते आणि नवकल्पक व्यावसायिक व्यक्ती एकत्र येऊन संवाद साधू शकतील, सहकार्य करू शकतील आणि विचारांची देवाणघेवाण करू शकतील. यासाठी येथे खास फोरम्स, मास्टरक्लासेस आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील.

या उद्घाटन सोहळ्यात नामांकित उद्योगपती, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर आणि सर्जनशील व्यक्ती एकत्र आले. या खास स्वागत समारंभात लाइव्ह परफॉर्मन्स आणि रुचकर भोजनाची मेजवानी होती.

द इम्पीरियल हे प्रत्यक्षात आलिशान पण साधेपणात भरलेले असे ठिकाण आहे, जे गुजरातच्या व्यापार आणि बुद्धिमत्तेच्या परंपरेचे जतन करते आणि भविष्यातील सहकार्य, संवाद आणि नेतृत्व घडवण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध करून देते.

# महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरणासाठी एआयडीच्या महत्त्वपूर्ण शिफारसी

**नागपूर, २५ ऑगस्ट :** महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण २०२४ प्रभावीपणे राबविण्यासाठी असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) तर्फे राज्य सरकारकडे महत्त्वपूर्ण शिफारसी सादर करण्यात आल्या आहेत. विकास आयुक्त (उद्योग) श्री. दीपेंद्रसिंग कुशवाह यांना एआयडीने नुकताच सविस्तर अहवाल सादर केला.

खासदार औद्योगिक महोत्सवातील एडवांटेज विदर्भ दरम्यान तसेच, त्यानंतर घेतलेल्या उद्योग भागधारक, लॉजिस्टिक्स सेवा पुरवठादार आणि पायाभूत सुविधा विकासकांसोबतच्या संवादातून या शिफारसी तयार करण्यात आल्या. धोरण दुसऱ्या वर्षात प्रवेश करत असताना, व्यापक मार्गदर्शक तत्त्वे तातडीने जाहीर होण्याची गरज असल्याचे एआयडीने अधोरेखित केले आहे.

एआयडीने मांडलेल्या प्रमुख प्रस्तावांमध्ये मध्यम लॉजिस्टिक्स पार्क या नव्या श्रेणीच्या निर्मितीची महत्वाची शिफारस आहे. किमान २५ एकर क्षेत्रफळ आणि ५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर आधारित ही श्रेणी लहान आणि मोठ्या पार्कमधील अंतर कमी करेल तसेच, टियर २ व टियर ३ शहरांमध्ये गुंतवणुकीचे नवे दार उघडेल, असे एआयडीचे मत आहे. विशेषतः विदर्भासह डी आणि डी+ क्षेत्रांत झोन-आधारित प्रकल्पांना गती देण्यासाठी स्पष्ट वेळापत्रक निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

गुंतवणूक वाढीसाठी एआयडीने भांडवली अनुदानाऐवजी ५ ते ७ टक्के व्याज अनुदान, स्वतंत्र लॉजिस्टिक्स युनिट्ससाठी आर्थिक प्रोत्साहन, दुर्गम भागांत वीज दरात सवलत, एमएसएमईसाठी ३ टक्के व्याज अनुदान आणि मुद्रांक शुल्कमाफी असे लाभ देण्याची शिफारस केली आहे. तसेच प्रस्ताव सादरीकरणाचे विकेंद्रीकरण करण्यावर भर देत, एमएसएमई प्रस्ताव जिल्हा पातळीवर डीआयसीमार्फत मंजूर व्हावेत, तर मोठ्या प्रस्तावांना राज्य पातळीवर पाठवण्यापूर्वी जिल्हास्तरीय छाननी व्हावी, अशी सूचना केली आहे. याशिवाय एमआयडीसीमार्फत सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली बळकट करणे, एफएसआय व अग्निसुरक्षा मानकांनुसार लॉजिस्टिक्स पार्कसाठी ७५ टक्क्यांपर्यंत ग्राउंड कव्हरेज देणे आणि नवीन तसेच विस्तारित युनिट्ससाठी स्पष्ट नियम जारी करणे यासंदर्भातही एआयडीने भर दिला.

या शिफारसी एआयडीच्या लॉजिस्टिक्स तज्ज्ञ समितीने अध्यक्ष शिवकुमार राव व सीए गिरीश देवधर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केल्या. एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे यांनी सांगितले की, गेल्या वर्षी २६ ऑगस्ट रोजी धोरण जाहीर झाले असले तरी आजही मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी झालेली नाही. या शिफारसी वेळेवर अमलात आल्यास महाराष्ट्र लॉजिस्टिक्स क्षेत्रात अग्रणी राहील, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करेल आणि संतुलित प्रादेशिक विकासाला चालना देईल.

# मला पहिल्यापासून फिटनेसचे वेड कधीच नव्हते, पण विराटच्या व्यक्तिरेखेला न्याय देण्यासाठी मला माझ्या कम्फर्ट झोनमधून बाहेर येणे भाग होते : रजत वर्मा



**मुंबई, २५ ऑगस्ट :** सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेली इत्ती सी खुशी ही मालिका त्यातील हृदयस्पर्शी कथानक आणि चारचौघांसारख्या व्यक्तिरेखा यामुळे प्रेक्षकांना आवडली आहे. मुंबईच्या पार्श्वभूमीवरील या मालिकेचे कथानक अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीभोवती फिरते. अन्विता आपल्या सहा भावंडांमध्ये सगळ्यात मोठी आहे आणि अचानक आपल्या कोसळत्या घराला आधार देण्याची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली आहे. अन्विताचा मित्र विराटची भूमिका करत आहे अभिनेता रजत वर्मा. त्याचे मोहक व्यक्तिमत्व आणि साधा स्वभाव यामुळे प्रेक्षकांचा तो लाडका झाला आहे.

एरवी आपल्या आसपास असतो असा मोहक व्यक्तिमत्वाचा तरुण म्हणून ओळखला जाणारा रजत यावेळी जरा ठसठशीत आणि पिळदार शरीराचा तरुण म्हणून स्वतःची ओळख उभी करत आहे. विराटच्या व्यक्तिरेखेला न्याय देण्यासाठी रजतने आपले स्नायू आणि शरीर पिळदार केले आहे. एरवी फिटनेसचे वेड नसलेला आणि जिममध्ये फारसा न दिसणारा रजत या भूमिकेसाठी तयारी करताना शरीरयष्टीवर काम करत आहे. शिस्तबद्ध वर्कआउट सेशन्सपासून ते आहारावरील नियंत्रणापर्यंत सारे काही करून रजत आपल्या व्यक्तिरेखेसाठी अपेक्षित असलेले मोहक व्यक्तिमत्व प्राप्त करण्यासाठी आपल्या कम्फर्ट झोनच्या बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहे.

आपल्यातील या बदलाविषयी रजत वर्मा म्हणतो, मला जेव्हा पहिल्यांदा विराटच्या भूमिकेबद्दल सांगण्यात आले, तेव्हाच मला हे उमगले होते की, ही भूमिका मी आजवर केलेल्या भूमिकांपेक्षा वेगळी असणार आहे. विराटची व्यक्तिरेखा ठसठशीत आहे आणि ती तशी दाखवण्यासाठी मला माझ्या शरीरयष्टीत बदल करणे गरजेचे होते. या भूमिकेसाठी स्नायू पिळदार करणे आवश्यक असल्याचे ध्यानात आल्यावर मी व्यायाम सुरू केला, आणि खरं सांगतो माझ्या तयारीतला हा सर्वात कठीण भाग होता कारण मला मुळात फिटनेसचे वेड नाही. मला तुम्ही जिममध्ये क्वचितच बघितले असेल. पण मला हे समजून चुकले होते की विराटच्या भूमिकेला न्याय देण्यासाठी मला माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर यावेच लागणार. हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. सकाळी लवकर उठायचे, कसून व्यायाम करायचा. त्यात वेट-लिफ्टिंग मी पूर्वी कधीच केले नव्हते. कधी कधी तर मला प्रश्न पडायचा की हे मला झेपेल ना ? पण प्रत्येक वेळी विराटची व्यक्तिरेखा पाहिल्यानंतर मला मेहनत करण्याची प्रेरणा मिळत असे. माझी इच्छा होती की, माझ्यातील हा बदल प्रेक्षकांना देखील पडद्यावर दिसावा आणि तो अस्सल वाटावा. या भूमिकेने मला शिस्त, संयम आणि चिकाटी हे गुण शिकवले आहेत आणि भले मला व्यायाम करणे आवडत नसले, तरी मी त्याचे महत्त्व जाणले आहे. कारण त्यामुळे एक अभिनेता आणि व्यक्ती म्हणूनही मला त्याचा उपयोग होत आहे.

# सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोकडून भारतात तळागाळातील नाविन्यतेला चालना देणाऱ्या ४० उपांत्य फेरीतील टीम्सची घोषणा

**मुंबई, २५ ऑगस्ट :** सॅमसंग इंडिया या देशातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने तरूणांकरिता त्यांची देशव्यापी नाविन्यता स्पर्धा सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो'च्या चौथ्या पर्वासाठी ४० उपांत्य फेरीतील टीम्सच्या राष्ट्रीय निवडीची घोषणा केली. या टीम्स आता स्पर्धेच्या पुढील टप्प्याकडे वाटचाल करतील, जेथे त्यांना सामाजिक प्रभावासाठी त्यांच्या संकल्पनांना अधिक विकसित करण्यासाठी मार्गदर्शन, प्रोटोटाइपिंग पाठिंबा आणि नाविन्यता प्लॅटफॉर्म्सची उपलब्धता मिळेल.

यंदाच्या उपांत्य फेरीतील टीम्समध्ये विविध भौगोलिक क्षेत्रांमधील टीम्सचा समावेश आहे, जेथे भारतातील १५ राज्यांमधील सहभागी आहेत, ज्यामध्ये कचार (आसाम), बागपत (उत्तर प्रदेश), मेहबूबनगर (तेलंगणा), दुर्ग (छत्तीसगड) आणि सुंदरगड (ओडिशा) अशा दुर्गम प्रांतांमधील सहभागी देखील आहेत. हा उपक्रम देशभरातील तरूण परिवर्तनकर्त्यांना निपुण करत आहे, तसेच त्यांना तंत्रज्ञान व नाविन्यतेच्या क्षमतेच्या माध्यमातून वास्तविक विश्वातील आव्हानांचे निराकरण करण्यास सक्षम करत आहे.

सॉल्व्ह फॉर टूमारोच्या २०२५ पर्वामध्ये चार प्रमुख थीम्सअंतर्गत प्रवेशिका मिळाल्या:

सुरक्षित, स्मार्ट आणि सर्वसमावेशक भारतासाठी एआय

भारतात आरोग्य, स्वच्छता आणि स्वास्थ्याचे भविष्य

शिक्षण व उज्ज्वल भविष्यासाठी क्रीडा आणि तंत्रज्ञानाद्वारे सामाजिक बदल

तंत्रज्ञानाद्वारे पर्यावरणीय शाश्वतता

निवडलेल्या संकल्पनांमधून भारतीय समाजात विकसित होत असलेले प्राधान्यक्रम निदर्शनास येतात, ज्यामध्ये हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण, जैवविविधता संवर्धन व शुद्ध पाण्याच्या उपलब्धतेसाठी एआय-नेतृत्वाखालील साधनांपासून अन्न अपव्यय आणि ई-कचरा व्यवस्थापनासाठी स्मार्ट उपायांचा समावेश आहे. इतर नवोपक्रमांमध्ये वंचित समुदायांमधील विद्यार्थ्यांसाठी गेमिफाइड लर्निंग, वैयक्तिकृत कोचिंग ॲप्स आणि ऑटिझम असलेल्या मुलांसाठी क्रीडा-नेतृत्वाखालील हस्तक्षेप यांचा समावेश आहे. आरोग्य व संशोधन क्षेत्रातील प्रकल्पांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचे लवकर निदान, मानसिक आरोग्य साधने आणि इंटेलिजण्ट डेटा स्क्रॅपिंगद्वारे टेक्निकल संशोधन सुलभ करणे समाविष्ट आहे.

आम्हाला सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५च्या अव्वल ४० उपांत्य फेरीतील टीम्सची घोषणा करताना आनंद होत आहे. द्वितीय व तृतीय श्रेणीची शहरे व दुर्गम भागांमधील हे तरूण नवप्रवर्तक समाजातील वास्तविक आव्हानांचे निराकरण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. त्यांच्या संकल्पनांमधून अर्थपूर्ण परिवर्तनाला गती देण्यासाठी भारतातील तरूणांची अविश्वसनीय क्षमता दिसून येते. ते पुढील टप्प्याच्या दिशेने वाटचाल करत असताना आम्ही त्यांना मार्गदर्शन, संसाधने आणि प्लॅटफॉर्मसह साह्य करू, ज्यामुळे त्यांना स्मार्ट, अधिक सर्वसमावेशक भारतासाठी त्यांच्या संकल्पनांचा वास्तविक विश्वामध्ये प्रभाव घडवून आणता येईल,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे कॉर्पोरेट उपाध्यक्ष एसपी चुन म्हणाले.

आम्हाला सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोसह आमचा सहयोग सुरू ठेवण्याचा अभिमान वाटतो. यंदा प्रादेशिक सादरीकरणावर लक्ष केंद्रित करण्यात आले आणि त्यामधून निवडलेल्या संकल्पनांची व्याप्ती व सखोलता स्पष्टपणे दिसून आली आहे. या तरूण नवप्रवर्तकांमध्ये भारतातील भावी स्टार्ट-अप परिसंस्थेला आकार देण्याची क्षमता आहे,'' असे एफआयटीटी-आयआयटी दिल्लीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. निखिल अग्रवाल म्हणाले.

## आज का अंदाज

मंगळवार २६ ऑगस्ट २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ५७८ | १५५ | २३९ | २६९ | ६८९ | २४९ | २४० | १३५ |
| १३६ | २२७ | ५९० | ४५८ | ४९० | ४५६ | ३६७ | ३६० |
| ३७० | ३८० | ३४७ | ३४० | ५८० | ३५७ | ४५७ | ५६८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३० | ५० | ६८ | ९८ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३४ | ५२ | ६७ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३४ | ५४ | ६१ | ९१ |

**२६ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ६४ | ९४ |
| २८ | ५८ | ६८ | ९८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

२ ५ ४ ३ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# क्रोमाच्या फेस्टिव्ह टेक ऑफर्ससह यंदाच्या गणेश चतुर्थीला ६०%* पर्यंतची मोठी बचत घरी आणा

**नागपूर, २५ ऑगस्ट :** टाटा परिवारातील एक सदस्य आणि भारतातील आघाडीचे ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमा यांनी गणेश चतुर्थीच्या निमित्ताने ऑगस्टमध्ये विशेष ऑफर आणल्या आहेत. या ऑफर २२ ते २९ ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि गोवा येथे सुरू आहेत. क्रोमा स्टोअरमध्ये आणि क्रोमा.कॉम वर खरेदी करून या ऑफर्सचा लाभ घेता येईल. इन्स्टन्ट बँक कार्ड डिस्काउंट देखील असल्याने ग्राहकांसाठी बचत करणे अजून जास्त सोपे होईल.



वर्षातील सर्वात मोठे सण लवकरच येतील, त्या दृष्टीने क्रोमाने पार्टी ऑडिओपासून ते रोजच्या स्वयंपाकघरातील आवश्यक वस्तूंपर्यंत अनेक श्रेणींमध्ये आकर्षक ऑफर सादर केल्या आहेत. रिअलमी टीडब्ल्यूएस फक्त ९९९ मध्ये खरेदी करता येईल, पार्टी स्पीकर विथ माइक २,९९९ पासून सुरू होणाऱ्या किमतीत आणि क्रोमाचा २०० वॅट्स पार्टी स्पीकर विथ वायरलेस यूएचएफ माइक फक्त १५,९९० मध्ये मिळेल. सोनी, जेबीएल आणि मार्शलच्या प्रीमियम हेडफोन्सवरील विशेष किमती ग्राहकांच्या उत्साहात आणखी भर घालतील. ग्राहकांना आघाडीच्या व्हॅल्यू ५जी स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर देखील मिळतील*.

ग्राहकांना खरेदी अधिक परवडण्याजोगी करण्यासाठी, क्रोमा ग्राहकांच्या सर्वाधिक पसंतीच्या कालावधीवर सुलभ ईएमआय सुविधा देत आहे. ग्राहकांना उत्पादनांच्या शीर्ष श्रेणींवर एक्सचेंज बोनस देखील मिळू शकतो. बिल मूल्य जितके जास्त असेल तितकी बँक बचत जास्त होईल.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्हाला अनेक स्रोतांकडून आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून चांगली बातमी मिळेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खास असेल. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी तुमची क्षमता दाखवण्याची संधी मिळेल, ऑफिसमधील प्रत्येकजण तुमची प्रशंसा करेल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी बदलाचा दिवस असणार आहे. आज तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत बदल कराल. आज तुम्ही एखाद्या संस्थेत सामील व्हाल आणि गरजूंना मदत कराल.

**कर्क :** आज तुमच्या नोकरीत यश मिळण्याची शक्यता आहे आणि तुमचा पगारही वाढू शकतो. कला आणि अभिनयाशी संबंधित लोकांना आज एका मोठ्या व्यक्तिमत्त्वाला भेटण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आज तुमच्या कौटुंबिक जीवनात आनंद असेल आणि तुम्हाला कामाच्या क्षेत्रात चांगले यश मिळेल. आज तुमचा अनुभव प्रतिष्ठेचे कारण बनेल आणि तुम्हाला समाजात आदर मिळेल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुमचे प्रलंबित काम पूर्ण होईल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्ही कामाच्या ठिकाणी तुमची कामे पूर्ण मनोबलाने पूर्ण कराल.

**तुळ :** आज तुमची आर्थिक स्थिती चांगली असेल. बौद्धिक कामांमध्ये तुम्हाला मान-सन्मान मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला तुमच्या कौटुंबिक जीवनात आनंद मिळेल.

**वृश्चिक :** आज आर्थिक स्थिती चांगली असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबासह सुंदर ठिकाणी जाऊ शकता. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. कामाच्या ठिकाणी बढती मिळेल.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ राहील. तुम्हाला तुमच्या नोकरीत चांगले निकाल मिळतील. आज परिस्थिती तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुम्ही कामाच्या ठिकाणी विरोधकांपासून दूर राहावे.

**मकर :** आज नक्की चांगली बातमी मिळेल, नोकरीत बढतीची तुमची प्रतीक्षा संपेल. आज नवीन पदामुळे कामाचा ताण वाढेल. कुटुंबाच्या समस्या सोडवण्यात यशस्वी व्हाल. कुटुंबासोबत वेळ घालवाल.

**कुंभ :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली कामे पूर्ण होतील. आज तुम्हाला कामावर तुमच्या सहकाजयांचा पाठिंबा मिळेल आणि तुम्ही तुमच्या मित्रांसोबत आनंदाने दिवस घालवाल. खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** आज तुमच्या बचत योजना यशस्वी होतील, तुम्हाला गुंतवणूक करण्याची सुवर्णसंधी मिळेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासह तीर्थयात्रेला जाऊ शकता किंवा एखाद्या चांगल्या ठिकाणी भेट देऊ शकता.

## शब्दकोडे क्रमांक २२०१



**आडवे शब्द :-**
१) भारताचा राष्ट्रीय पक्षी
३) टाळता न येणारे
५) जमीनदार
७) शपथ
९) वैरभाव, शत्रुत्व
१०) शर्त
११) निमित्त
१२) वाघाची मावशी
१३) किरकिर, गडबड, त्रास
१५) एक सुगंधी फूल
१६) विशेष
१८) सोन्याचा पार्वत
२१) कुबेराचा सेवक
२३) भात शिजतानाचा आवाज
२५) ढगाळ हवा
२६) गावाखालची जमीन
२८) वस्तूनिर्मितीची जागा
३०) गंध
३१) अस्वल
३२) रवाळ
३३) श्रीमंत माणूस
३६) आकडा, मांडी
३८) चरण
३९) इंद्र
४०) अनुमती
४१) धमकी
४२) एकटा
४३) प्रत्यक्ष कृती
४५) एक उन्हाळी सुगंधी फूल
४९) कबूतर
५०) जोडीदार, मदतनीस
५३) स्थळ, ठिकाण
५५) सदोदित
५८) आठवण
६०) सप्तस्वरातील पहिला स्वर
६१) मत्स्य
६२) सूर्य, चंद्र
६३) नंतर
६५) पशू, जनावर
६६) नाविकदल
६८) जन्म मृत्यू
७१) बडबड्या
७२) विल्हेवाट, निकाल
७३) नाकावरील मोत्याचा दागिना
७४) एक प्रश्नार्थक शब्द

**उभे शब्द :-**
१) मधुमक्षिका
२) अतिशय रूक्षता
३) आठाचा समूह
४) दारावरील खुणेचा आवाज
५) स्तुती करणारा
६) शरीर
७) भारताचा नागरिक
८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०) तर्क, अनुमान
११) आजच्या आधीचा दिवस
१४) हट्ट, दुराग्रह
१५) धनी
१७) राजवाडा
१९) आकाश
२०) एक नशा आणणारा पदार्थ
२२) माफ
२३) रम्य
२४) चेष्टा, उपहास
२५) मज्जाव
२७) लहान, सूक्ष्म, पातळ
२९) क्षारयुक्त पाणी
३०) शाब्दिक भांडण
३२) कपाळ फुटणे
३४) बेचव
३५) परस्त्रीशी संग करणारा, यार
३६) स्वीकारणे, पतकरणे
३७) ठाणवई
४१) औषध
४२) पटाईत
४४) कणीदार पीठ
४६) दुःख, खेद
४७) रक्तवाहिनी
४८) चुलता
५१) कापडाचा एक प्रकार
५२) वीस दस्त्याचे पुडके
५४) एखाद्याच्या विरुद्धच्या तक्रारी
५५) खरगोश
५६) बिना वासाचे पांढरे फूल
५७) ऐक्य, तादाम्य
५९) संगीतातील एक राग
६१) एक सुगंधी वनस्पती
६४) प्रस्थान करणे
६५) जीव
६६) आरोप, संशय
६७) खवा
६९) व्यापारातील फायदा
७०) पौराणिक अश्ववाहन

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कॅलिडोस्कोप




## कलिंगडाचे वजन १५९ किलो!

कलिंगड उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. एका अशा कलगडाची चर्चा ऐकून कुणीही थक्क होईल. हे कलिंगड इतके मोठे होते, की त्याला उचलायला क्रेनची मदत घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठे कलगड जगासाठी चर्चेचा विषय बनले होते. या विशाल कलगडाचे वजन इतके होते, की त्याला सामान्य माणसाने उचलण शक्यच नव्हते. २०१३ मध्ये अमेरिकेच्या क्रिस केंट यांनी हे कलिंगड पिकवले होते. त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून या कलगडाचे वजन तब्बल १५९ किलो भरले, जे 'द वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ गिनीज बुक' मध्ये नोंदवले गेले. हे कलिंगड एका साधारण कलिंगडापेक्षा १५ पट जास्त जड होते. त्यामुळे ते उचलण्यासाठी विशेष यंत्रणा लागली. क्रिस केंट यांनी स्वतःच्या खास बियांपासून हे कलगड पिकवले होते. प्रदर्शनासाठी ते घेऊन जाण्यासाठी त्याला क्रेनचा वापर करावा लागला. हे बघण्यासाठी आजूबाजूच्या लोकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेने सर्वांनाच आश्चर्यचकित केले होते. हे कलगड क्रेनने उचलून एका खास जागी ठेवले होते, जेणेकरून त्याचे वजन आणि आकार सर्वसामान्यांना पाहता येईल. भारतात कलगडाची शेती उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. भारतात एकूण कलगड उत्पादन सुमारे २,४९५ हजार टन आहे. कलिंगडात सुमारे ९२ टक्के पाणी असल्यामुळे ते शरीराला थंड ठेवते आणि पाण्याची कमतरता दूर करते. याशिवाय, कलगडात अनेक जीवनसत्त्वे आणि पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

**भारतात कोणत्या राज्यात जास्त उत्पादन?**

उत्तर प्रदेश हे भारतात सर्वात जास्त कलिंगडाचे उत्पादन घेणारे राज्य आहे. येथील सुपीक जमीन आणि हवामान कलिंगड पिकवण्यासाठी खूप अनुकूल आहे. २०२१-२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये १६.८६ हजार हेक्टर जमिनीवर कलिंगडाची शेती झाली होती, जे भारतातील एकूण उत्पादनाचा सर्वात मोठा भाग होते. २०२४ मध्येही उत्तर प्रदेशातच कलिंगडाची सर्वाधिक शेती झाली.

## आवाजाचे नोट्समध्ये रूपांतर करणारे मशीन

केरळच्या अभियांत्रिकीच्या काही विद्यार्थ्यांनी एक मशीन बनवले आहे. ते आवाज ऐकते आणि ते हस्तलिखित नोट्समध्ये रूपांतरित करते. हे आश्चर्यकारक मशीन लिहिता येत नसणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल. सोशल मीडियावर या शोधाची खूप चर्चा होत आहे. केरळच्या विद्यार्थ्यांनी 'एआय' मशीन मॉडेल बनवले आहे. अभियांत्रिकीचा अभ्यास करणारा विद्यार्थी अजय एच. आणि त्याच्या टीमने एक अनोखे मशीन बनवले आहे. या मशीनचे नाव 'टॉक टू राइट' आहे. तुम्हाला फक्त बोलायचे आहे आणि मशीन तुमचे बोललेले शब्द कागदावर लिहिते. हे मशीन नुकतेच 'एन्टे केरलम एक्स्पो' नावाच्या एका मोठ्या सरकारी कार्यक्रमात दाखवण्यात आले.

अजयच्या म्हणण्यानुसार हे मशीन बोललेले शब्द जसे आपण हाताने लिहितो तसेच लिहिते. मशीनला एक मायक्रोफोन जोडलेला असतो. समोरची व्यक्ती बोलल्यानंतर ऐकून घेणारे मशीन हळूहळू ए-४ कागदावर त्याच्या पेनने लिहिते. तेही अगदी सुबक अक्षरात, ओळीमध्ये. फक्त बोलून, ते कागदावर आज्ञा लिहिते. हे मशीन बनवण्यासाठी रास्पबेरी पाई, आर्डिनो (जीआरबीएल) आणि पायथॉन नावाच्या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. या सर्व तंत्रज्ञानाचा वापर संगणक, रोबोट आणि प्रोग्रामगमध्ये केला जातो; परंतु अजय आणि त्याच्या टीमने त्यांचा वापर डिजिटल स्क्रिब (म्हणजे तुमच्या वतीने लिहू शकणारा सहाय्यक) बनवण्यासाठी केला आहे. याचा सर्वात मोठा फायदा शारीरिकदृष्टया कमकुवत लोकांना होईल. हाताने लिहू न शकणारे कवा बोलून काम करू इच्छिणाऱ्यांना हे तंत्र कुठेही उपयुक्त ठरू शकते, मग ते शाळा, ऑफिस कवा घर असो..




## स्वतः बॅटरी बदलणारा रोबो

कल्पना करा, तुमचा मोबाईल स्वतः चार्जिंग स्टेशनवर जाऊन त्याची बॅटरी काढून नवीन बॅटरी लावत असेल तर... तर तुम्हाला कसे वाटेल? आता एका रोबोटनेही असेच काम केले आहे. रोबो बनवणाऱ्या चीनच्या प्रसिद्ध यूबी टेक रोबोटिक्स कंपनीने वॉकर एस२ नावाचा मानवासारखा भासणारा रोबो बनवला आहे. या रोबोने असा जुगाड बनवला आहे, की आता त्याला थांबून चार्ज करण्याचीही गरज नाही. बॅटरी कमी होते, तेव्हा तो स्वतः बॅटरी बदलणाऱ्या स्टेशनवर जातो आणि त्याची एक बॅटरी काढून चार्जिंगवर ठेवतो आणि दुसरी पूर्ण चार्ज असलेली बॅटरी लावतो. नंतर तो न थांबता पुन्हा कामाला लागतो. हे अद्भूत तंत्रज्ञान दुहेरी बॅटरी सिस्टीमवर काम करते. म्हणजे त्यात दोन बॅटरी आहेत. ही सिस्टिम एका बॅटरीसह काम करते आणि तुम्हाला हवे तेव्हा दुसरी बदलू शकते. यामुळे ती कधीही बंद करावी लागत नाही. चार्जिंगचा त्रास नाही, व्यत्यय येत नाही. एक बॅटरी संपू लागते, तेव्हा रोबो काय करायचे ते समजून घेतो. जणू एखाद्या माणसाला भूक लागली आहे आणि तो कोणालाही न सांगता स्वतः जाऊन अन्न खातो. तशीच या रोबोटची बॅटरी बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया खूप सोपी आणि मजेदार आहे. वॉकर एस२ त्याच्या हातांनी मागच्या बाजूला जोडलेली बॅटरी काढून शेल्फमध्ये ठेवतो आणि तिथून एक नवी बॅटरी काढून आत घालतो. हे काम करण्यासाठी त्याला फक्त काही मिनिटे लागतात. त्याला कोणत्याही मदतीची आवश्यकता पडत नाही कवा कोणत्याही सूचनांची आवश्यकता रहात नाही. तो हे सर्व स्वतः करतो. ही



प्रणाली चीनमधील काही इलेक्ट्रिक कारसारखी आहे, जिथे बॅटरी चार्ज करण्याऐवजी थेट त्या बदलल्या जातात. सोशल मीडिया वापरकर्ते त्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, 'मानव स्वतः श्वास घेऊ शकतात आणि खाऊ शकतात, रोबो ही आता नवी गोष्ट राहिलेली नाही.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, 'रोबो एके दिवशी सर्व मानवांना खातील. दुसऱ्या एका वापरकर्त्याने लिहिले, एक दिवस जगात फक्त रोबो असतील आणि माणूस पुस्तकांमध्ये अस्तित्वात असेल.

## ये दोस्ती...

युरोपमधल्या पर्वतरांगांमध्ये आढळणारा मेर्मोट हा प्राणी लाजराबुजरा आहे. मेर्मोट माणसांजवळ जात नाही. तो बिळामध्ये राहतो. माणसं जवळ आली की लगेच बिळात निघून जातो. मेर्मोट खूप चपळ असतो. शेकरू कवा खारीसारखा दिसणारा मेर्मोट खूप गोंडस असतो. ऑस्ट्रियाचा मेटियो वॉच या मेर्मोटचा मित्र आहे. प्राणी आणि माणसाच्या मैत्रीच्या बऱ्याच कथा आपण ऐकल्या आहेत. मेर्मोट आणि मेटियो यांची मैत्रीही अशीच अनोखी आहे. गेल्या अकरा वर्षांपासून मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्रीचे बंध जुळले आहेत. मेटियो दरवर्षी या मेर्मोटना भेटायला येतो. मेटियो आल्यावर मेर्मोट खूप खूश होतात. १४ वर्षांचा मेटियो इन्सबूकला राहतो. २०१२ मध्ये मेटियो आणि मेर्मोटमधली ही मैत्री चर्चेचा विषय ठरली होती. मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्री नेमकी कशी झाली हे कोणालाही माहीत नाही. पण हे मेर्मोट मेटियोला अजिबात घाबरत नाहीत. उलट, त्याच्यासोबत खेळतात. मेटियोची आई मेर्मोट आणि मेटियोचे फोटोही काढते. मेटियोची अगदी लहानपणीच मेर्मोटशी मैत्री झाली होती.





## त्या शिकवतात वाहतुकीचे नियम

लोकांनी वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात बऱ्याच अंशी कमी होऊ शकतात, अनेकांचे जीव वाचू शकतात. वाहतूक पोलिसांकडून नागरिकांना वेळोवेळी सूचना दिल्या जातात. जागरूकता मोहिमा राबवल्या जातात. पण नागरिकांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. म्हणूनच इंदूरमधल्या वृंदा नावाच्या महिलेने ही जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. ५८ वर्षांच्या वृंदाताई दररोज संध्याकाळी चार ते सहा या वेळेत वाहतूक पोलिसाच्या भूमिकेत असतात. नव्या वर्षात लोकांना वाहतुकीच्या नियमांप्रती जागरूक करण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. त्या तासभर विजयनगर चौकात आणि तासभर सयाजी चौकात हा उपक्रम राबवतात. वाहनांना थांबवून वाहतुकीच्या नियमांबाबत सजग करतात. म्हणूनच वृंदा या भागात बऱ्याच लोकप्रिय झाल्या आहेत. इंदूरला स्वच्छतेच्या बाबतीत पहिला क्रमांक मिळाला आहे. मात्र आता वाहतुकीच्या नियमांबाबतही शहराला पहिला क्रमांक मिळायला हवा, असं त्यांना वाटतं. म्हणूनच त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

## २२ वर्षे मेकअप! चेहराच बनला भीतीदायक

मेकअप करायला कोणाला नाही आवडत?, छान दिसण्यासाठी, चेहऱ्याला उठाव देण्यासाठी, सौंदर्य वाढवण्यासाठी मेकअप करायला बहुतांश लोकांना आवडते; पण मेकअप केल्यानंतर, दिवसाअखेर कवा झोपायला जाण्यापूर्वी मेकअप काढून चेहरा स्वच्छ धुणे गरजेचे असते. अनेक सौंदर्यतज्ज्ञही हाच सल्ला देतात; मात्र मेकअप काढून चेहरा नीट धुतला नाही तर काय होऊ शकते याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? चीनमधील गाओ या महिलेने कधीही विचार केला नव्हता की तिच्यासोबत असे काहीतरी वाईट घडेल. ती वीस वर्षे दररोज मेकअप करत होती; पण तो काढणे कवा उतरवणे, चेहरा धुणे याची तिला झंझट, कटकट वाटायची. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा मेकअप लावावा लागणारच असेल, तर रात्री तो का धुवावा, असा विचार ती करायची; पण त्याचा परिणाम खूप भयानक झाला. आता तिच्या चेहऱ्याची अवस्था इतकी वाईट झाली आहे, एवढी



ॲलर्जी झाली की तिला ओळखणेच शक्य नाही. चेहरा एवढा सुजला, की साधे घाराबेहर पडण्याचीदेखील तिला भीती वाटू लागली. चीनमधील या महिलेचे नाव गाओ असे आहे. तिने स्वानुभवातून आता 'सोशल मीडिया'वर सर्वांना इशारा दिला आहे. मेकअप केल्यानंतर तो नीट काढणे, मेकअप उतरवणे, चेहरा व्यवस्थित धुणेही खूप महत्वाचे आहे. तिने स्वतः २० वर्षे मेकअप केला; पण कधीही तिचा चेहरा व्यवस्थित स्वच्छ केला नाही. ती चेहरा फक्त पाण्याने धुवायची आणि सकाळी चेहऱ्यावर पुन्हा मेकअप थापायची. सुरुवातीला सगळे व्यवस्थित चालले होते; पण या वर्षी इतकी ॲलर्जी झाली, की तिचा चेहरा पूर्णपणे सुजला. इतके की, तिला ओळखणेही कठीण झाले. असे वाटले की हजारो मुंग्या चेहऱ्यावर धावत आहेत. तिला प्रचंड खाज सुटते, तिचा चेहरा सुरकुत्याने भरलेला आहे आणि भीतीमुळे तिने लोकांना भेटणेही बंद केले आहे. सुरुवातीला, तिने डॉक्टरांकडे जाण्याऐवजी स्किन क्लिनिकमध्ये जाऊन इंजेक्शन घेतले; पण त्यामुळे तिची प्रकृती आणखी बिकट झाली. या अनुभवावरून धडा घेऊन गाओ आता सर्वांना समजावून सांगते, की कोणताही मेकअप करा; पण झोपण्यापूर्वी चेहरा व्यवस्थित स्वच्छ करणे आवश्यक आहे. फक्त पाण्यानेच नाही, तर चांगल्या फेसवॉशने. अन्यथा चेहरा सुंदर नाही, तर भयानकही बनू शकतो असा इशारा तिने दिला.



## ट्रेडमिलचा देशी जुगाड!

आता तुम्हाला ट्रेडमिलवर धावण्यासाठी जिम फी भरण्याची गरज नाही, ना तुम्हाला वीज बिलाची काळजी करण्याची गरज आहे, ना मोटार बिघाडाची भीती. कारण देशी मनाने असा जुगाड केला आहे, की तो पाहून परदेशी मशीन्सनाही लाज वाटेल. आता एक चित्र बघा. गावाच्या एका कोपऱ्यात एक ट्रेडमिल उभी आहे; पण ती सामान्य नाही, ती पूर्णपणे देशी आहे. ती बॅटरीवर ना बॅटरीवर चालते, ना करंटवर. तिला चमकदार स्क्रीन नाही; मात्र त्यात चिखल, निसरडा, जलद वाहणारा नळ आणि स्टँड आहे. गावातील रस्त्यांवर बनवलेल्या या अनोख्या ट्रेडमिलला कोणताही बेल्ट नाही. त्याऐवजी एक छोटा स्टील स्टँड आहे, जो जमिनीत गाडलेला आहे. ती व्यक्ती तो स्टँड धरते. त्याच्या खाली ओली, चिकट, निसरडी कच्ची माती पसरली आहे. जेव्हा एखादी व्यक्ती तिथे उभी राहून पाय हलवू लागते, तेव्हा पुढे सरकत नाही; पण त्याच्या पायांचा व्यायाम होतो. शहरातील लोक जिथे विचार करून थकतात, तिथे गावकरी विचार करतात. सर्वात खास गोष्ट म्हणजे त्यात बसवलेला पाण्याचा नळ. स्टँडच्या एका कोपऱ्यात बसवलेला हा नळ उच्च दाबाने पाणी सोडतो. त्यामुळे माती सतत ओली राहते. आणि जेव्हा माती ओली असते, तेव्हा घसरण वाढते. जेव्हा घसरण वाढते, तेव्हा शर्यतदेखील त्यानुसार वेगवान दिसते. परिणामी माणूस त्याच ठिकाणी राहतो आणि स्वतःला थकवतो.



## मंगळ मोहिमेसाठी विनोदवीर

सध्या मंगळ ग्रहाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. भारतानेही मंगळयान मोहीम राबवली आहे. चंद्रानंतर आता मंगळ ग्रहावर जीवसृष्टीचा शोध घेतला जात आहे. मात्र पृथ्वीवरून मंगळावर जाणं खूप कठीण आहे. चंद्र पृथ्वीपासून जवळ आहे. पण मंगळाचं तसं नाही. नासा या अमेरिकेतल्या अंतराळ संशोधक संस्थेने मंगळ मोहिमेच्या अडचणींची एक यादी तयार केली. त्यात पृथ्वी आणि मंगळ ग्रहामधलं अंतर, तिथलं वातावरण अशा काही बाबींचा समावेश होता. मंगळ ग्रहावर मोठ्या प्रमाणावर किरणोत्सर्ग होतो. मंगळाचं कोणतंही चुंबकीय क्षेत्र नसल्यामुळे या किरणोत्सर्गाचं प्रमाण बरंच जास्त आहे. या किरणांकडे माणूस उघड्या डोळ्यांनी बघू शकत नाही. त्यांच्यामुळे मोतीबदू तसंच डोळ्यांच्या कॅन्सरचा धोका वाढतो. पृथ्वीपासून मंगळ ग्रह जवळपास १४ कोटी मैल आहे. चंद्रावर जाण्यासाठी अंतराळवीरांना तीन दिवस प्रवास करावा लागतो. पण मंगळापर्यंत पोहोचण्यासाठी काही महिने लागू शकतात. एवढा वेळ अंतराळात घालवणं हे मोठं आव्हान असू शकतं. कितीही प्रशिक्षण दिलं तरी अंतराळवीरांना काही काळानंतर अडचणी येऊ लागतात. म्हणूनच मंगळावर माणूस पाठवण्याच्या मोहिमेसाठी नासा विनोदवीरांचा शोध घेते आहे! यामुळे म्हणे अंतराळवीर तणावमुक्त राहू शकतील...




## कॅटलिनचं चालतं फिरतं घर

स्कॉटलंडमधल्या एका विद्यार्थिनीने घरभाड्याला कंटाळून चालतंफिरतं घर बनवून टाकलं. तिच्या या कल्पनेचं सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. २५ वर्षांची कॅटलिन मॉ विद्यार्थिनी आहे. स्कॉटलंडमधल्या एका घरात राहण्यासाठी ती महिल्याला २५० पाउंड भाडं देत होती. २५० पाउंड म्हणजे जवळपास २३,४०३ रुपये. घराचं भाडं सतत वाढत होतं. घरभाडं, वीजबिल तसंच इतर खर्चांमुळे कॅटलिनचं दिवाळं निघत होतं. मग तिने एक शक्कल लढवली. कॅटलिनने एक व्हॅन विकत घेतली आणि आता या व्हॅनलाच ती घराचा लूक देते आहे. तिने ३५ वर्षांपूर्वीची एक व्हॅन तीन हजार पाउंडांना विकत घेतली. या व्हॅनमध्ये बदल करून घरासारखं सजवण्याचा तिचा प्रयत्न आहे. घरभाडं म्हणून महिन्याला २५० पाउंड देण्यापेक्षा एका व्हॅनचं घरात रुपांतर करून त्यात राहणं तिला योग्य वाटतं. कॉलेज आणि इतर कारणांसाठी कॅटलिन बराच काळ घराबाहेर असते. फक्त रात्री झोपण्यासाठी घरात यायचं आणि त्यासाठी २५० पाउंड खर्च करायचे हे तिला योग्य वाटत नव्हतं. म्हणूनच तिने ही कल्पना लढवली. आता ती या व्हॅनमध्ये छोटं स्वयंपाकघरही बसवणार आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या व्हॅनमधूनच ती युरोपची भ्रमंती करणार आहे. कॅटलिनची ही शक्कल भन्नाटच म्हटली पाहिजे.

